
▪ वर्ष:४ थे ▪ अंक: ३ रा ▪ ऑगस्ट २०१९ ▪ किंमत:३० रूपये

मासिक

# शिक्षण यात्री

।। ज्ञानम् सर्वजन हिताय ।।



शिक्षणाचे ओझे
की
ओझ्याविना
शिक्षण?

## शिक्षणाचे ओझे
## की
## ओझ्याविना
## शिक्षण?

# शील हवे शब्दाला...

सूर्याने विचारले जेंव्हा चंद्राला
जगी अंधार का मी पाहिला !
मेघाने उत्तरले तेंव्हा पृथ्वीला
घसा माझा कोरडा का राहिला !
नभाने सुनावले तसे क्षितीजाला
पाय माझा अधांतरी का टांगला?
माणसाने दरडावले बिचाऱ्या माणुसकीला
श्वापदासम माझा तू गळा का घोटला?
बाप काकुळतीला अन् म्हणे मुलाला
शब्द माझाच मुका का झाला?
एक विचारी दुसऱ्याला अन् दुसरा विचारी तिसऱ्याला
अंधार का दाटला जगी, अन्याय का वाटला !
आवाज दिला माझ्या स्वरानेच मला
शील हवे शब्दाला माझ्या, शील हवे शब्दाला ।।धृ।।
वाढला घेर पोटाचा, आशा झाली मुजोर
ढील हवे भुकेला माझ्या, ढील हवे भुकेला ।।१।।
गर्जना केली आक्रोशाने, दाटला कंठ कारूण्याचा
बीळ हवे लपण्याला आता, बीळ हवे लपण्याला ।।२।।
झेंडे काठ्या पताका यांचा, खेळ अघोरी रंगला
पीळ हवे दंडाला माझ्या, पीळ हवे दंडला ।।३।।



**डॉ. पुरूषोत्तम भापकर,**
(भा.प्र.से.)

# पत्रास कारण की,

आदरणीय गुरूजी,

सा. न. वि. वि.

मागील अंकातील अंडी केळीच्या ओझ्याचा लेख आवडला असावा. विशेषत: जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची खरंच अवस्थ बिकट आहे. हे करू कि ते करू या विचारातच शाळेची वेळ सरत असावी. या कामांच्या रहाटगाड्यात बिचारी मुले शुद्धलेखन, पाढे, लिहा यापुढे सरकतच नसावीत. शैक्षणिक म्हणा की अशैक्षणिक कामांची यादी लांबतच चाललीय. असो पण तुम्ही पण 'ग्रेट' आहात गुरूजी. सारे काही सांभाळण्यात तरबेजच आहात.

जसे तुम्ही कामाच्या ओझ्याखाली आहात ना तसंच मुलंदेखील दप्तराच्या ओझ्याखाली आहेत ना? नेहमीच वर्तमान पेपरात दप्तराच्या ओझ्याचा प्रश्न वाचनात येतो. इतक्याच किलोचे दप्तर हवे नि एवढेच वजन दप्तराचे हवे. हा प्रश्न वारंवार येतो. का येतो कळतच नाही. मुलांच्या पाठीवर ओझे नको, त्रास होतो, आजार वाढतात अशा एक ना अनेक भानगडी आहेत. तरी तुम्ही मार्ग काढतातच म्हणा. दप्तर हलके करण्यासाठी.

गुरूजी, पाऊस भरपूर झाला .तुमची शाळा नक्कीच गळाली असेल. मुलांना बसायला जागा नसेल कदाचित. तांदळाची पोती मदतीला घेत जा. फरशी कोरडी राहिली की बरे. शाळा दुरूस्तीचा प्रस्तावही नेहमीच देत जा. मंजुर होईल कधीतरी.

शालेय डागडुजी किंवा दुरूस्ती म्हटली म्हणजे अंगावर काटे येत असतील नाही. कारण खर्चायला पैसा मिळवणं महा कठीण. येणाऱ्या दहा पंधरा हजार अनुदानात वर्षभराचा खर्चाचा ताळमेळ गुरूजीच कसं लावतात देव जाणे. शाळेतील झाडू पासून खडूपर्यंतचा खर्च करतांना होणारी घालमेल कठीणच. त्यातल्या त्यात आता रोजच्या भाजीपाल्यासोबत अंडी केळीचा भार उलावा लागतोय. तेही अनुदान येईल तोवर असंच उधार उसणवारी चालवावी लागेल.

तिकडे पश्चिम महाराष्ट्रात पावसाने कहरच केला. पूराच्या पाण्याला काय म्हणावे? वाट मिळेल तिकडे पाणी सुसाट धावलं. अनेकांना उघड्यावर आणलं. अशा पाण्यात शाळांची अवस्था बिकट झाली असेल. कागदपत्रे भिजली असतील? नमुना नं. एक भिजायला नको म्हणजे झालं. शाळेचा आत्मा असतो ना! म्हणूनच बहुतेक शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापकांनी नमूना नं.१चे डिजीटलायझेशन करण्यास सुरूवात केली आहे. म्हणून आपणही भविष्यात शाळेच्या आत्म्याशी खेळ नको यासाठी नमुना नं. १ सुधारून घ्यावा. असो गुरूजी, बाकी सारे व्यवस्थित चाललंय ना. चालायचंच. सतरा अडचणी आहेत त्या सोडवायला तुम्ही समर्थ. म्हणूनच एकंदर गुरूजी वर्गाचा मात्र अभिमान वाटतो.

**आपलाच**

**सुभाष दादा**

ता.क्रं.-पुरग्रस्तांना एका दिवसाचा पगार देण्याचा फतवा लवकरच निघणार असल्याने सामाजिक बांधिलकीचा भाव समस्त गुरूवर्गाच्या मनी असणार असल्याचे कळते.


**शिक्षकांचे हक्काचे व्यासपीठ**

▶ वर्ष : ४ थे

▶ अंक:३ रा ▶ ऑगस्ट २०१९

• संपर्क •

शिक्षणयात्री

क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे

चलभाष : 8208301001

shikshanyatri11@gmail.com

• सह संपादक •

सुभाषदादा कुलकर्णी

• संपादन सहाय्य •

संदेश नंदकिशोर हजारे

प्रा.अनिल जाधव शिरपूरकर

• मांडणी •

प्रगती आर्टस्,शिरपूर ९४२२२३३२९४

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी

• कायदेशीर सल्लागार •

ॲड.शाम पाटील

पी.आर.बी.ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्यकारी संपादकांवर.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.



# ओझ्याविना शिक्षण !

**संदेश नंदकिशोर हजारे**
शिरपूर जि.धुळे
९८५०९६४६०१

महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेला भेडसावणारा प्रश्न कोणता असेल तो दप्तराच्या ओझ्याचा (गुणवत्तेचा सोडून?). गुणवत्तेचा प्रश्न बाजूला मात्र इतर प्रश्नांनीच अग्रक्रम घेतलाय. जड दप्तर नको, पुस्तकाची रचनाच बदला, गणित असच शिकवा यापेक्षा समस्त शिक्षक बांधवापुढे अनेक प्रश्न आहेत. त्यावर चर्चा घडायला हवी. 'गुणवत्तेचा' मार्गच मुळी वळणावळणाचा आहे. थेट पोहचतच नाही.

दप्तराचे ओझे यावर खूप चर्चा झाली. मा.न्यायालयाने मार्गदर्शन केले. शासन निर्णय निघाले. विद्यार्थ्यांच्या वजनाच्या १०% वजन दप्तराचे असावे. साधारणता पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांचे दप्तर दिड-दोन किलो तर तिसरी चौथी अडीच-तीन किलो दरम्यानच असावे. (शासन निर्णय-शालेय शिक्षण विभाग दि.२१/०७/२०१५ व दि.०५/११/२०१५). यापेक्षा जास्त वजन आढळल्यास संचालक व मुख्याध्यापक यांना जबाबदार धरण्यात येणार असल्याने हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

मग यासाठी अनेक उपाययोजना शिक्षक बंधु करताहेत. पुस्तकांचे दोन सेट एक घरी एक शाळेत तर सर्व विषयांसाठी एकच वही, विनादप्तर शाळा अशा विविध मार्गाने दप्तराचे ओझे कमी करतांना दिसतात. शासनानेही छोटी लॉकर्स केंद्र शाळांना उपलब्ध करून दिली आहेत. एकंदरीत शासन पातळीवरचे सारेच घटक दप्तराचे ओझे कमी करू लागलेत.

मात्र नवल पालकांचे वाटते. त्यांनीच या दप्तराच्या ओझ्यातून मुलांची सुटका करून घेतल्याचे दिसते. शहरातील मुले व्हॅन, रिक्षा यातून शाळेला येतात तेव्हा दप्तराचे ओझे मुलांना न होता व्हॅनलाच तर ग्रामीण भागातील मुलांना शाळेत पोहोचविणारे आई वडिल (विशेषत: आई) दप्तर स्वत:च्या पाठीवरच घेऊन जात असल्याने ओझ्याविना मुले मोकळी व स्वतंत्र चालतांना दिसतात. शाळा सुटल्यानंतर बाहेर उभे राहून पालकांची ओझे पेलण्याची तयारी दिसून येते. आपल्या मुलाला थोडेही ओझे नको मग ते दप्तराचे असो वा शिक्षणाचे याबाबत पालक दक्ष दिसून येतात. मुलांच्या अभ्यासाचे जेवढे टेंशन मुलांना नसते तेवढे पालक चिंताग्रस्त दिसतात. शाळेतील गृहपाठाच्या वह्या पुर्ण करतांना पालकांचीच दमछाक दिसून येते. मुलांकडून गृहपाठ करून घेण्याचा महत्प्रयास पालकांना घडतो. त्या कला, कार्यानुभव या प्रात्याक्षिकांचा प्रश्नही पालकंच सोडवतात. वास्तविक मुलांना स्वत:ला करू देण्यात अर्थ आहे. पण पालकच पुढे पुढे करतांना दिसतात. शाळेतील शिक्षकांनी सांगितलेल्या प्रत्येक कामात पालकांची लुडबूड चालूच असते. आता डायरी संस्कृती असल्याने शिक्षक-पालक संवाद डायरीच्या माध्यमातून घडतो. आपसुकच विद्यार्थ्याच्या शिक्षणाचे ओझे पालकांनी आपल्या खांद्यावर घेतल्याचे दिसते.

सध्यातर शाळेतील मुलांकडे प्रवासी बॅग सारख्या ओढून नेता येणारी दप्तरे पाहण्यात आली.जसे काही मुले शाळेत न जाता प्रवासालाच निघालीत. म्हणजेच दप्तरे तयार करणाऱ्यांनीही मुलांच्या दप्तरांचा ओझ्याचा प्रश्न मनावर घेतलेला दिसतोय, म्हणूनच त्यांनी ट्रॅव्हलींग बॅग सारखे दप्तर शोधून काढले. एकदा एका पालकाला विचारले, मुलांचे दप्तर पाठीवर घेऊन तुम्ही का जाताय? मुलाला धरू द्या नं. पालकांचे उत्तर अहो. ''दप्तर जड आहे ना. आणि अभ्यासही पेलवत नाही. मग येता-जाता तेवढाच भार कमी . फ्रेश राहील तो.'' बघा, आपल्या मुलाला फ्रेश ठेवण्यासाठी पाठीवर दप्तराचे ओझे घेवून जाणारे पालक पाहिले की ओझ्याविना शिक्षणाचा मार्ग दिसून येतो.



**सागर देशपांडे**
संपादक
जडण-घडण,पुणे.

# दप्तर जड-ज्ञान हलके !



'महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेतील गोंधळाचं आणि संभ्रमाचं वातावरण तसंच कायम रहावं' अशीच बहुधा या व्यवस्थेशी संबंधित सर्व घटकांची इच्छा असावी. हा गोंधळ कधी शाळेत मुलांना कोणत्या वयात दाखल करायचा इथून सुरू होतो आणि कोणत्या शाळेत, इंग्रजी की मराठी माध्यमांच्या? सरकारी की खासगी शाळेत? शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार की त्यातून पळवाटा शोधून देण्याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या एजंटांच्या मर्जीनुसार, स्टेट बोर्डाची शाळा की सी.बी.एस.ई. आणि अन्य पॅटर्नची शाळा, शिक्षणात विविध प्रयोग करणाऱ्या शाळांमध्ये आपलं मूल असावं की सुटा-बुटातल्या, हाय-फाय इंग्रजी बोलणाऱ्यांच्या कळपात आपलं मूल सोडावं? त्याला त्याच्या वयानुसार, शारीरिक क्षमतेनुसार, आवडीनुसार दप्तर नेण्याची सुविधा असावी की बालवयापासूनच 'जड झाले ओझे'! म्हणून किरकिरत, नाईलाजाने त्यानं या शिक्षण व्यवस्थेत दाखल व्हावं? सरळ मार्गानी शाळा-कॉलेजात प्रवेश घ्यावा? की शेजारचं मूल/नातेवाईकांची मुलं पाहिजे तेवढं डोनेशन देऊन जिथं प्रवेश घेतात, अशा (तथाकथित) प्रतिष्ठित शाळेत आपल्या मुलाचं शिक्षण व्हावं? प्रचलित शिक्षण व्यवस्थेतून आपल्या मुला-मुलीला खरंच काही आनंद मिळतोय काय? की ते केवळ ओझ्याच्या गाढवासारखी (मालाची ने-आण करणाऱ्या) पाठ्यपुस्तकं, गाईडं, वर्कबुक्स, डबे, पाण्याच्या बाटल्या, स्वेटर, रेनकोट अशा ज्ञानाशिवाय इतरच साधनांची ने-आण करत आहे? आपल्या मुला-मुलीला मिळणारं शिक्षण खरंच त्याला त्याच्या आयुष्यासाठी उपयोगी पडणार आहे का? त्यातून त्याला काही आनंद मिळेल का? हे शिक्षण त्याला त्याच्या पायावर उभं राहण्यासाठी, स्वावलंबी होण्यासाठी उपयोगी पडणार आहे की नाही? या आणि अशांसारख्या अनेक प्रश्नांची भेंडोळी पालकांच्या/आई-वडिलांच्या मनात असतात.

मुंबईसारख्या महानगरात तर आता लग्न ठरलं की मुलांसाठी पाळणाघरं शोधावी लागतात. आपलं राहण्याचं ठिकाण, वेळोवेळी बदलत जाणाऱ्या नोकऱ्या या दोन्हींच्या अनुषंगाने दिवसभर त्या लहानग्या जीवाला ठेवण्याचं ठिकाण सापडलं की, संसारात 'पडणाऱ्या' आई-वडिलांचा जीव भांड्यात पडतो. मग शाळा प्रवेशाचा हंगाम. मुलाला शिक्षण/माहिती/ज्ञान हे सगळं एकत्रितपणे मिळावं यासाठी अट्टाहासपूर्वक निवडलेल्या किंवा मिळालेल्या शाळेत रिक्षा आणि पिवळ्या गाड्यांमधून मुला-मुलींना पाल्याच्या शैक्षणिक करियरची आणि एकूणच आयुष्याची सुरू होणारी फरफट आपण जरा निवांतपणे अभ्यासली तर कळून येईल की, आनंददायी शिक्षणाऐवजी आपण त्या

मुला-बाळांसह आपल्यालाही पालक म्हणून 'व्यवस्था' नावाच्या एका चरकात नाईलाजाने घालत असतो आणि अख्या घरादाराला पिळून काढत असतो.

अनक पालकांशी,मुलांशी, शिक्षकांशी, संस्था चालकांशी, प्रशासकांशी, अधिकाऱ्यांशी बोलताना या आणि अशा अनेक प्रश्नांचे गुंते डोळ्यासमोर उभे राहत असतात. 'पाण्यात पोहणाऱ्या माशाला ज्याप्रमाणे तिथंच सगळं मिळत असतं, तितक्याच सहजपणे आपल्या मुलांना शिक्षण मिळालं पाहिजे' अशी काही विचारवंतांनी व्यक्त केलेली अपेक्षा. आणि आज दिलं जाणारं शिक्षण यात प्रचंड तफावत आहे. ती दूर होण्याऐवजी व्यवस्था नावाचा राक्षस ही तफावत आणखी वाढवत चालला आहे की काय असंच चित्र आपल्या आजूबाजूला दिसतं.

**विद्यार्थी 'दशा'**

विद्यमान शिक्षण व्यवस्थेपेक्षा पूर्वीचा गोंधळ स्केलमध्ये कमी होता एवढाच दिलासा ज्याने मिळू शकेल अशी पु.ल.देशपांडे यांच्या कथाकथनामधली 'बिगरी ते मॅट्रिक' ही ध्वनीमुद्रिका आपण सर्वांनी (पुन्हा) एकदा वेळ काढून ऐकायला हवी. त्या काळात आजच्याइतक्या शैक्षणिक सुविधा नव्हत्या आणि आजच्या इतकं दप्तरांचं आणि अपेक्षांचंही ओझं नव्हतं. तरीही शिक्षणाचं आणि गुणवत्तेचं सार्वत्रिकीकरण यातला पेच सोडवत सोडवत त्या काळातही गुणवत्तेने पुढं जाणारी पिढी घडलीच की .

शाळा-कॉलेजात जाणारी मुलं-मुलीच फक्त विद्यार्थी असतात ही बहुतांशी मंडळींच्या मनातील संकल्पना दूर करणं अजूनही आपल्याला जमलेलं नाही. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक माणूस, आबालवृद्ध, स्त्री-पुरूष ही आयुष्यभर रोज काही ना काहीतरी शिकतच असते. ठरवून किंवा न ठरवता देखील. याचा अर्थ आपण आयुष्यभर विद्यार्थीच असतो, असलंच पाहिजे. शिकणं थांबलं की टिकून राहण्याचा सोस निरर्थक ठरू लागतो.

शिक्षक-पालक म्हणजे केवळ समोरच्यांना, दुसऱ्यांना शिकवणारा माणूस हाही गैरसमजच म्हणावा लागेल. त्याचं कारण शिक्षक म्हणजे दुसरा पालक आणि पालक म्हणजे पहिला शिक्षक. या दोन्ही घटकांनी आपण स्वत: उत्तम विद्यार्थी असणं गरजेचं आहे. विद्यादानाचं व्रत स्वीकारण्यापूर्वी त्यानं स्वत: उत्तम विद्यार्जन केलेलं असलं पाहिजे. केवळ डी.एड.,बी.एड.,एम.एड.च्या पदव्या मिळवून भागणार नाही. शिक्षण, शिकवणं आणि ज्यांच्यासाठी हे सर्व करायचं आहे ते विद्यार्थी हे सारे घटक त्या-त्या शिक्षक-शिक्षिकेच्या जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, स्नेहाचे, प्रेमाचे असले पाहिजेत. प्रत्येक मुला-मुलीशी त्याचे व्यक्तिगत ऋणानुबंध निर्माण व्हायला हवेत. त्यासाठी क्लास टीचरच असलं पाहिजे असं नाही. मुलांची नावं ही फक्त हजेरीपत्रक आणि निकालापुरती राहून चालणार नाहीत, ती शिक्षकाच्या स्नेहकोशात कायमची नोंदली गेली पाहिजेत. किमानपक्षी ते मूल जोपर्यंत त्या-त्या शाळा-कॉलेजात आहे तोपर्यंत तरी. यासाठी मुलांसमवेत आपणही रोज नव्यानं काहीतरी शिकत असतो, मुलांच्या निमित्तानं आणि मुलांकडूनही काही शिकत असतो ही भावना सदैव शिक्षक पालकांच्या ठायी असणं खूप महत्त्वाचं आहे. या संदर्भात खुद्द रवींद्रनाथ टागोर यांचं वचन अतिशय मोलाचं आहे ते सांगतात,A teacher can never truely teach, unless he is still learning himself. A lamp can never light another lamp unless it continues to burn its own flame .

जो स्वत: सातत्याने, अखंडपणे अध्ययन करत असतो तोच चांगले अध्यापन करू शकतो. दिवा स्वत: जळत असतो, उजळत असतो. म्हणून एक दिवा पेटता असल्याशिवाय दुसरा दिवा कसा प्रज्वलित होणार? दिव्यानंच दिवा लावावा लागतो.

या भावनेतून स्वत: जो नेहमी शिकण्याच्या मानसिकतेत राहू शकतो, तोच उत्तम शिकवण्याचं काम करू शकेल हे सूत्र मनाशी पक्कं करायला हवं. सुदैवाने आज अशी मानसिकता असलेल्या शिक्षक, प्राध्यापक, पालकांना अन् कुणालाही शिक्षण देणारी, माहिती देणारी, ज्ञानाची नवनवी कवाडं खुली करून देणारी साधनं फार मोठ्या संख्येने विज्ञान-तंत्रज्ञानामुळे उपलब्ध आहेत. शेतमजूर महिलेपासून एखाद्या अब्जाधीश उद्योगिनीपर्यंत आज मोबाईलचं तंत्रज्ञान समान पातळीवर उपलब्ध आहे. हँडसेटच्या कंपन्या आणि

किंमतीमध्ये प्रचंड तफावत असू शकते. परंतु तंत्रज्ञानाचे फायदे दोघांनाही सारखेच उपलब्ध होत असतात. अशा वेळी ज्ञान मिळवण्याची साधनं आपल्या हाताशी आहेत. ती सर्वांना उपलब्ध आहेत. प्रश्न आहे तो आपण त्याचा फायदा करून घेण्याचा. अशा काळात आजही आपल्या शिक्षण व्यवस्थेला, सरकारला, पालकांना, मुलांना आणि न्यायालयाला देखील मुलांच्या दप्तरांच्या ओझ्याचा प्रश्न हाताळावा लागतो. मुलाच्या शारीरिक वजनाच्या फक्त दहा टक्के एवढंच दप्तराचं वजन असायला हवं. असा निष्कर्ष संबंधिक तज़्ज्ञांनी काढला आहे. वस्तुस्थिती काय आहे? आपण आपापल्या घरी खात्री करून घेऊ शकतो. प्रमाणापेक्षा अधिक वजनाच्या दप्तरामुळे मुलांना पाठदुखी, मान सुजणं, फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होणं, सांधे आणि स्नायू आखडणं, मणक्यांची झीज होणं, शारीरिक आणि मानसिक थकवा येणं, डोकेदुखी अशा अनेक व्याधींना लहान वयातच सामोरं जावं लागतं. शहरी भागातल्या मुला-मुलींच्या पाठीवर तर त्यांच्या वजनाच्या तीस टक्के वजनाची दप्तरं असतात असं दिसून आलं आहे. या सगळ्यात आणखी एक गमतीचा भाग म्हणजे, बालवाडीपासून दहावीपर्यंतच्या शिक्षणात मुला-मुलींच्या पाठीवरील दप्तराचं ओझं इयत्तेनुसार वाढत जात असतं. मॅट्रिकनंतर आपण जेवढं उच्च शिक्षण व्यवस्थेकडे जाऊ लागतो, तिथं दप्तराचं ओझं नसतंच. एका टॅबमध्ये, लॅपटॉपमध्ये आख्खा अभ्यासक्रम आणि संदर्भसाहित्य समाविष्ट करण्याची सोय झोलेली आहे. सरकारसह आपण सर्वांनीच लक्षात घ्यायला हवं की, ज्या वयात मुला-मुलींना शिक्षणाची, अभ्यासाची, माहिती आणि ज्ञान मिळवण्याची गोडी लागायला हवी त्याच वयात आपण त्यांच्या पाठीवर पुस्तकं-वह्या-गाईडं आणि इतर साधनांचं तसेच अपेक्षांचं ओझं एवढं लादून ठेवतो की, त्यातच ते मूल वाकून जातं, पिचून जातं. हे शिक्षण आणि इथली शिक्षण व्यवस्था त्याला नीरस वाटू लागतं. या सगळ्यातून मुक्ती मिळवण्यासाठी मग ते मूल पालकांच्याच कृपेनं मोबाईल, व्हॉटस्अप, दूरदर्शन वाहिन्या, संगणक-इंटरनेट या साधनांशीच अधिक सलगी करू लागतं. शिक्षक म्हणजे धाक दाखवण्यासाठी पालकांनी पैसे भरून सुरू ठेवलेली कठोर यंत्रणा असल्याचं त्याला वाटू लागतं आणि पालकांना ही मुलं तर ए.टी.एम. च समजू लागतात. शाळा व्यवस्थापन, सरकार, शिक्षक, पालक आणि त्यांच्या संघटना, शिक्षणतज्ज्ञ, प्रसारमाध्यमं...त्यातली मंडळी या प्रश्नांचा एकत्रितपणे वेध घेताना दिसत नाहीत. प्रश्न आणि समस्या सोडवण्यापेक्षा त्यांचा बाऊ करण्याकडंच आपले समाजघटक आणि सरकारी यंत्रणा अधिक झुकलेली दिसून येते.

शिक्षण हक्क कायद्याचा जी.आर.समोर ठेवून चालणाऱ्या यंत्रणेनं लक्षात घ्यायला हवं की, ज्याला शिकायचं आहे, शाळा-कॉलेजात जायचं आहे. त्याला शाळा, भाषा-माध्यम निवडण्याचं, बदलण्याचं कोणतंच स्वातंत्र्य नाही. त्याबाबत त्या मुला-मुलींची समजूतच आपण विकसित करत नाही. (म्हणजे त्यासाठी मुळात आपली समजूत विकसित झालेली हवी.) वर्षभरात सुमारे १४५ दिवस म्हणजे सरळ-सरळ ५ महिने बंद असणाऱ्या शाळा, वर्षाकाठी कोणत्या ना कोणत्या कारणानं ६९ दिवस बंद असणाऱ्या आपल्या सार्वजनिक व्यवस्थेतील यंत्रणा आणि जागतिकीकरणासह वैश्विक पातळीवरील अनेक बदलांमुळे गुणवत्तेसह अनेक निकषांबाबतची परिमाणं रोजच्या रोज बदलत असतानाही आपल्या सरकार आणि समाजव्यवस्थेला मुलांच्या दप्तरांच्या ओझ्याचा प्रश्नच इतका जड वाटू लागला असेल तर दुर्दैवानं दप्तरंच जड होत जातील आणि ज्ञान हलकं-हलकं होत जाईल. मुला-मुलींच्या मनात ज्ञान मिळवण्याची आवड आणि ध्यास निर्माण होण्याऐवजी, त्याची गोडी लागण्याऐवजी आपण त्यांच्या डोक्यात फक्त माहितीचा साठाच भरतो आहेत का? याचाही गांभीर्यानं विचार करायला हवा. शिक्षणासारख्या विषयांमधले काही प्रश्न सरकारी यंत्रणेनं तज़्ज्ञांवर आणि संबंधित घटकांवर सोडले पाहिजेत आणि शिक्षणातल्या मंडळींनीही सगळ्या समस्या सरकारनं सोडवाव्यात या भ्रमात राहून चालणार नाही. प्रत्येक गोष्टीसाठी सरकार आणि न्यायालयाचे दरवाजे ठोठावून चालणार नाही. आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा विचार करून शाळांनी हा प्रश्न स्वयंस्फूर्तीने सोडवायला नको का?

(साभार-जडण-घडण)



# दप्तराच्या ओझ्यातून सुटका

**सी.डी.पाटील**
आर.सी.पटेल मराठी प्राथमिक
शाळा,शिरपूर जि.धुळे
चलभाष : ९८८१०३३३४८

दप्तराचे ओझे हा प्रश्न नेहमीच सतावतो. मुलांच्या पाठीवरील दप्तर जड नको याचे शासनादेश पाळण्यासाठी नवनवीन उपक्रम राबवले जातात. माझ्या शाळेतही याकडे योग्य त्या कटाक्षाने पाहिले जाते. अवजड दप्तराने मुलांची पाठ सांभाळली जावी यासाठी आम्ही खालील उपक्रम राबवित असतो.

वेळापत्रक :- वेळापत्रकात जोडून तासिकांचे नियोजन केले जाते जेणेकरून कमी नोटबुक आणण्यास मदत होते.शिक्षक वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करतात

ऑल इन वन नोटबुक :- वर्गकामासाठी सर्व विषयांची एक वही (रजिस्टर) केले जाते. यात विषयनिहाय भाग केले जातात. गृहकामासाठी देखील सर्व विषयांसाठी एकच वही(रजिस्टर) केले जाते. वर्गकामाच्या वह्या वर्गातच ठेवण्याची व्यवस्था केली आहे. फक्त गृहकामासाठी असलेले रजिस्टर विद्यार्थी दररोज ने -आण करतात.

जून्या पुस्तकांचा सदुपयोग:- या उपक्रमात शासनाने दिलेली मोफत पाठयपुस्तके शैक्षणिक वर्षाच्या शेवटी वर्गशिक्षकांनी गोळा करायची असतात व सदर पुस्तके वर्गातच कायमस्वरूपी बाकावर ठेवण्यात येतात.वर्षाच्या सुरुवातीला शासनाने दिलेली मोफ़त पाठयपुस्तके विद्यार्थ्यांना घरी अभ्यासासाठी कायमस्वरूपी दिलेली असतात.पाठयपुस्तकांची दप्तरातून ने-आण करण्यात येत नाही.अशा प्रकारे जुन्या पुस्तकांचा वर्गात अभ्यासासाठी उपयोग केला जातो.

एक बाक एक पुस्तक: एका बाकावर एका जुन्या पुस्तकाची व्यवस्था वर्गशिक्षक करून देतात. बाकावरील दोन विद्यार्थी एका पुस्तकाचा अध्ययनासाठी वापर करतात. यातून वाटेहून घेण्याची भावना वाढीस लागते. ही पुस्तके आपल्याला वर्षभर हाताळायची आहेत त्यासाठी विद्यार्थी काळजीपूर्वक पुस्तकांची हाताळणी करतात.

वॉटर बॅग व टिफिन कमी वजनाचे वाळरण्याबाबत शाळा कायम आग्रही असते. पालकांना पालक संभामधून दप्तराचे ओझे याबाबत मार्गदर्शन केले जाते. वॉटर बॅगमध्ये अर्धा लीटर पाणी येईल एवढीच वाटर बॅग विद्यार्थी वापरतात. पोषण आहार शाळेतून मिळत असल्याने रिकामा डबा विद्यार्थी घेवून येतात.

निबंध, प्रयोग वही, नकाशा वही शाळेतच ठेवण्याची व्यवस्था प्रत्येक वर्गात केलेली आहे.

हलक्या वजनाचे दप्तर बाजारातून विकत घेण्याबाबत पालकांना सूचना केल्या जातात. दप्तर किमान पाच ,सहा वर्षे टिकले पाहिजे हा गैरसमज पालकसभांमधून दूर केला जातो.

दप्तर नियंत्रण कमिटी: प्रत्येक इयत्तेचा वर्गशिक्षक या कमिटीचा सदस्य असून शाळेचे मुख्याध्यापक या कमिटीचे अध्यक्ष आहेत. कमिटीतील निवडक सदस्य वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन करतात व त्याबाबत पालकांना व शिक्षकांना मार्गदर्शन करतात. तशा नोंदी ठेवल्या जातात.

शाळेत वजन काट्याची व्यवस्था:-शासनाच्या आदेशानुसार मुलांच्या वजनाच्या दहा टक्के वजन दप्तराचे असावे या बाबत शाळा उपरोक्त बाबींचे आग्रह पूर्वक हाताळणी करते. दप्तर नियंत्रण कमिटी वजनकाट्याचा नियमित वापर करतात. यामुळे दप्तराचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

संस्थेचे कार्यकारी अधिकारी उमेशजी शर्मा यांच्या माध्यमातून सर्वच विद्यार्थ्यांच्या दप्तरांच्या ओझ्याबाबत



# शिक्षणाचे ओझे की, ओझ्याविना शिक्षण...!

**अजित अप्पासाहेब डांगे**
उपशिक्षक, चैतन्य विद्यालय, ओतुर
ता.जुन्नर जि.पुणे.
चलभाष : ९९७०१५४५८८

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे व मानवी जीवनाच्या उन्नतीचे एक अतिशय महत्वाचे साधन आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी व व्यक्तीला एक आदर्श जीवन जगण्यासाठी शिक्षण हा एक अविभाज्य घटक आहे. ज्ञान मिळविणे हा जरी शिक्षणाचा उद्देश असला तरी शिक्षणाचे ओझे झाले आहे. असा आरोप होतांना दिसतो. त्यातच इंग्रजी माध्यमाचा अमाप खर्च वाढलेला आहे. त्यातीलच दप्तराचे ओझे हा मोठा प्रश्न निर्माण झालेला दिसतो. दप्तराचे ओझे म्हटले की, मला आठवते ती कवी आरती प्रभू यांची कविता,'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, कशासाठी उतरावे तंबू ठोकून...!'

शिक्षणाच्या ओझ्याकडे अर्थातच दप्तराकडे पहिले तर असे वाटते की, दप्तराबरोबर मुलांचे एक वेगळेच भावबंध असतात. किमान दहा वर्षे तरी दप्तर ओझे आणि विदयार्थी नाते घट्ट जोडलेले आहे. शालेय जीवनातील आठवणीचा महत्वाचा भाग म्हणजे शाळेचे दप्तर. School bag is identity of students in school. असे असले तरी वाढत्या स्पर्धेच्या युगात विदयार्थी ज्ञानार्जनासाठी व पालकांच्या वाढलेल्या अपेक्षा यामुळे दप्तराचे वजन एका गिर्यारोहकाप्रमाणे वाढलेले दिसते. पालकाला वाटते आपले मूल हुशार व्हायला पाहिजे, पैकीच्या पैकी गुण त्याला मिळाले पाहिजेत. म्हणून Students walk with the bag Loads of knowledge. School bags are loaded with dreams and searching parent's expectation, aim and hopes within.

आज जर पाहिले तर देशाच्या सर्वेक्षणात तेरा वर्षाखालील ६८ टक्के मुलांना दप्तराच्या ओझ्यामुळे सांधे आखडणे, मणक्याची झीज होणे, थकवा येणे, पाठीचा कणा, मान दुखणे, शरीराची ठेवन बिघडणे, स्नायुवर दबाव येणे, खांदे दुखू लागतात असे निदर्शनास आले आहे. या दप्तराच्या ओझ्याविषयी पालक, शिक्षक, राजकारणी, शासन, शिक्षणतज्ञ चिंता करतात.

विद्यार्थ्याचे दप्तर बघितले तर, त्या दप्तरामध्ये प्रत्येक विषयाला २/३ वह्या, वर्कबुक, गाईड, शिष्यवृत्तीची पुस्तके, टिफिन, पाण्याची बाटली, डायरी, कंपास, शब्दकोश, चित्रकला साहित्य, स्वेटर, रेनकोट, छत्री व खेळ साहित्य, इत्यादी दप्तरामध्ये दिसते.मग तुम्हीच मला सांगाना खरोखर शिक्षणाचे ओझे झाले आहे का ?

आजवर शासनाच्या माध्यमिक शाळा संहितेच्या कलम ४४ नुसार शासनाने मंजूर केलेल्या पाठ्यपुस्तकाशिवाय इतर पुस्तके शाळांनी वापरण्यास बंदी केलेली आहे. डॉक्टर यशपाल आयोगाचा 'ओझ्याविना अध्ययन' या अहवालाची अंमलबजावणी मात्र झाली नाही. शासनाला माध्यामिक शाळांच्या पाहणीत दप्तराचे वजन ४ ते १० किलोग्राम पर्यंत आढळले. २१ जुलै २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे दप्तराचे वजन विद्यार्थ्यांच्या वजनापेक्षा १० टक्केहून अधिक असू नये. असे असताना देखील त्याच्या वजनाच्या २०-३० टक्के दप्तराचे वजन जास्त आढळून आले. शासन निर्णयानुसार दप्तराचे वजन इयत्ता १ ली २.०१० किलो ग्रॅम, दुसरी २.२३५ किलो ग्रॅम, ३ री. २.५० किलो ग्रॅम, ४ थी २.८३ किलो ग्रॅम, ५ वी ३.१९ किलो ग्रॅम, ६ वी ३.२९५ किलो ग्रॅम, ७ वी ३.७८५ किलो ग्रॅम

व ८ वी ४.२४५ किलो ग्रॅम असे ठरवून दिलेले आहे.

अनेक देशांमध्ये शाळेतच दप्तर ठेवण्यासाठी लॉकर दिले जातात. ई बुकचा वापर केला जातो. असे असताना देखील आपल्याला काय करता येऊ शकेल ? तर वेळापत्रकानुसारच पालकांनी दप्तर द्यावे. प्रथम सत्र व द्वितीय सत्र वेगळ्या वह्या द्याव्यात. खेळ साहित्य शाळेतच उपलब्ध करून द्यावे, पिण्याचे पाण्यासाठी शाळेतच आर. ओ. बसवावे, ग्रंथालयातच स्पर्धा परीक्षेची पुस्तके ठेवावीत, गृहपाठ शाळेतच पूर्ण करून शाळेतच ठेवाव्यात, प्रयोग वह्या प्रयोग शाळेतच ठेवाव्यात, भाषा विषयाचे पुस्तक दोघात एकच आणावे. विद्यार्थ्यांनी शाळेत फुलस्केप कागद न्यावे त्यावर दिवसभराचे शिकविलेले विषयानुसार लिहून घेऊन घरी आल्यावर त्याचे फायलिंग करावे, डी.व्ही.डी., ई लर्निंग, एल. सी. डी. प्रोजेक्टरचा वापर, दीक्षा ॲप च्या साह्याने विषयाचे QR CODE च्या साह्याने वाचन करावे. महिन्यातून एक दिवस दप्तराविना शाळा व त्याच दिवशी विषयवार गप्पा, अवांतर वाचन, वकृत्व स्पर्धा, निबंध, प्रश्न मंजुषा, क्षेत्रभेट, प्रयोग, प्रकल्प तयार करणे, पुस्तकी अभ्यासाबरोबरच खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम घेणे यामुळे एक वेगळा आनंद विद्यार्थ्यांना मिळेल व त्यांना दप्तराचे ओझे कमी झाल्यासारखे वाटेल.

शिक्षण हे हसत खेळत व्हायला हवे. विदयार्थी आनंदी असेल तर त्यांची मानसिकता उत्साही असते आणि त्यांचा अभ्यासाकडे बघण्याचा दृष्टीकोनही तेवढाच सकारात्मक बनतो. सांगा जर असे केले तर वाटेल का तुम्हाला शिक्षणाचे ओझे ? निश्चितच होईल ओझ्याविना शिक्षण.

*शिक्षणवार्ता...*

## जि. प.च्या शाळांसह शिक्षकांच्या सेवा होणार हस्तांतरित

राज्यातल्या वेगवेगळ्या महापालिकेच्या हद्दीचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शहरांचा जलद विकास करण्याच्या दृष्टीने हद्द वाढवताना जिल्हा परिषद शाळांचे महापालिकेकडे हस्तांतर करण्याची बाब राज्य सरकारच्या विचाराधीन होती. याबाबत वेगवेगळ्या जिल्ह्यांतील तज्ज्ञांकडून सूचना मागविल्यानंतर ग्रामविकास विभागाने हस्तांतरणाला हिरवा कंदील दाखवला आहे. शाळा हस्तांतरित करताना शिक्षकांची सेवाही महापालिकेकडे वर्ग करण्यात येणार आहे. या वेळी कोणती कार्यवाही करण्यात यावी यासंबंधी शासन निर्णय गुरुवारी ग्राम विकास विभागाकडून जारी करण्यात आला आहे. सुरुवातीला महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रवाढीमुळे हस्तांतरित होणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमधील एकूण रिक्त पदांचा आढावा घेण्यात यावा, महानगरपालिका / नगरपालिकांना कोणत्या माध्यमांच्या शाळेत किती शिक्षकांची आवश्यकता आहे याची संख्या निश्चिती करावी आणि त्यानंतर शासन निर्णयाप्रमाणे रिक्त पदांवर कार्यवाही करण्यात यावी, असे नमूद करण्यात आले आहे. या पदांवर शिक्षक दिनाच्या सेवा हस्तांतरित कारण्यासाठी प्रत्येक पदाच्या संवर्गानुसार जिल्ह्यातील सर्व शिक्षकांकडून विकल्प घेणे आवश्यक असणार आहे. या शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी तयार करून प्रसिद्ध करण्यात यावी, असेही जारी केलेल्या निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

**पुढील एक वर्ष बदलीतून मिळणार सूट**

ज्या शिक्षकांच्या सेवा हस्तांतरित होणार आहेत, त्यांना पुढील एक वर्ष बदलीतून सूट मिळणार असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषद शिक्षक धोरण त्यांना लागू असणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतची सर्व कारवाई पार पाडणे अपेक्षित आहे.



# मुलांच्या कल्पनांच्या खजिन्याचा कुबेर मी!

**युवराज माने**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी,
तालुका सेलू जिल्हा परभणी.
चलभाष-७५१७४७८५७०

मुलांच्या डोक्यात कल्पनांचं वेगळे जग असतं. कल्पना साकार करण्यासाठी ते सतत धडपडत असतं. ही साकार करण्याची शक्ती प्रत्येक मुलाजवळ असते आपण त्याला फक्त अवकाश द्यायचा असतो.

इटुकली पिटुकली मुलं कल्पनेच्या राज्यातच वावरतात. या कल्पनेच्या झुल्यावर खेळता-खेळता ती मोठी होत असतात. त्यांच्या कल्पनांना तसेच धुमारे फुटत राहतात. हे लक्षात घेऊन याच बालवयामध्ये भविष्यातील उत्तम स्वरूपाची समाजास उपयुक्त व राष्ट्रास सक्षम बनवणारी 'आनंदाची झाडं' पेरली गेली पाहिजेत. काही कृती अतिशय लहान वाटतात. मात्र यातून या लेकरांना केवळ निसर्गाप्रतीचा संदेश न देता त्याच्या जीवनातील सर्वच विषयाचा अभ्यास झालेला असतो. वर्ग पहिलीपासून अशा वेगवेगळ्या कृतींना डोळसपणे वर्गात राबविल्यानंतर भविष्यातील  अनेक समृद्ध अशी नागरिक निर्माण होतील. झाड हलल्यावर प्राजक्ताची फुले टपटप पडावीत तशी एकापाठोपाठ एक कृती करायला मुले पुढे येऊ लागतात अन, शिक्षणाचा हा आनंददायी प्रवास सहज सोपा होऊ लागतो.

शिक्षण म्हणजे फक्त पुस्तक शिकणं नाही. केवळ काही घटना जाणीव हीनतेने आठवणं नाही. पुस्तकं बोलतात .पुस्तके जगण्याची शक्ती देतात .आपल्याला शिक्षणाचा एवढाच अर्थ माहीत होतो की, शिक्षण म्हणजे फक्त परीक्षा देणे, पदव्या घेणे आणि नोकरी करणं. खरं कोण शिकवतं? निसर्ग, निसर्गात घडणाऱ्या वेगवेगळ्या घटना मुलं शाळेत येत असताना किंबहुना ज्या परिसरात राहतात त्या परिसरात घडत असताना त्यांच्या ज्ञानेंद्रियांनी पाहत असतात. मुलं वेगवेगळ्या पक्षांचा आवाज ऐकतात तेव्हा मुलं एक जगणं समजावून घेत असतात. गावाशेजारी झुळझुळ वाहणारी नदी व आकाश बघतो तेव्हा समृद्धता ,व्यापकता याची शिकवण मुलं घेत असतात. डोंगर-दऱ्या ,नदी-नाले यातून निर्माण होणारे वेगवेगळे आकार त्यातून गणित शिक्षण घेत असतात. अशा निसर्गाच्या सानिध्यात जाणं म्हणजे कल्पनांच्या विश्वात प्रत्यक्ष सैर करणं होय.

लहान असताना मुलांच्या मनात अनेक गोष्टी आकार घेऊ लागतात. पण शाळा या बंदिस्त स्वरूपाच्या चाकोरीबद्ध माणूस निर्माण करणाऱ्या संस्थेत हेच बालमन प्रवेश करतो तेव्हा मनात निर्माण होणाऱ्या या वेगवेगळ्या गोष्टींचा आकार आपण फिस्कटून टाकतो. निसर्गाच्या सौंदर्याची आपली जाणीवच नष्ट होत जाते. मात्र माझ्या 'शिक्षणाच्या आनंदवनात' रमणारी माझी आनंदाची झाडं दररोज नित्य नव्या कल्पनांचा खजिना घेऊन शाळेत दाखल व्हायची. दररोज नवीन नवीन कल्पनांचा पेटारा खुलला जायचा. आता गुरुजी आणि मुलं यात कुठलाही आडपडदा राहिला नव्हता. मी म्हणजे त्यांच्यातलाच एक  असा विश्वास त्यांना पटला होता. आणि आमचं शिकणे म्हणजे चार भिंतीच्या आत आता राहिलं नव्हतं. सतत नावीन्याच्या शोधामध्ये शाळेतील मुलांची डोळे भिरभिरायलेली  असायची. शाळेतील आपला गुरुजी म्हणजे मनसोक्त व्यक्त होण्याचे ठिकाण ! असा विश्वास सर्वांनी प्राप्त केला असल्यामुळे प्रत्येक जण नवी संकल्पना मांडायचा ती सर्वांना आवडायची. शाळेच्या आवारामध्ये सर्वांनी मिळून

परसबाग तयार केली होती. त्या परसबाग मध्ये दररोज झाडांना बघणं, झाडांचं उमलणं, वेगवेगळ्या पानांचे आकार बघणं , आकाशातले रंग बघणं, परसबागेमध्ये वेगवेगळ्या पक्ष्यांची ये जा पाहणं त्यांचे आवाज ऐकणे व यातून वर्गात सर्वांना अवगत करणं हा नित्यक्रम चालू होता. गोंदिया जिल्हा! निसर्गाने नटलेला जिल्हा! त्यामुळे आम्हाला निसर्गाकडून खूप काही नवं नवं शिकायला मिळालं. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बांबूच्या बुडाशी 'बांबोडी'(मशरूम) नावाची वनस्पती उगवायची आणि ती केवळ जून महिन्याच्या सुरुवातीच्या पंधरा-वीस दिवसांमध्ये निर्माण व्हायच्या. अतिशय प्रोटीनयुक्त असलेली ही वनस्पती.त्यापासून तयार होणारी भाजी चविष्ट लागायची. माझ्या शाळेतील सर्व चिमुकल्यांनी ठरवलं की ती एकत्रित आणायची आणि शाळेतील सर्व मुलांना ती द्यायची आणि खरोखरच मुलांनी आपल्या शेतातील आजूबाजूच्या जंगलातून ही वनस्पती घेऊन आले आणि आम्ही शाळेमध्ये त्याची चविष्ट अशी भाजी तयार केली. याशिवाय निसर्गातून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या पदार्थांचा रानमेवाही फार उपलब्ध होता. शाळेच्या मध्यान्ह भोजनामध्ये सुद्धा वेगवेगळ्या प्रकारची पाले भाज्या व फळ भाज्या सहजरित्या मुलांच्या कल्पनातून साकार होऊ लागल्या व त्या सर्वांच्या आहारात जाऊ लागल्या. शाळेच्या परिसरामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या येणाऱ्या पक्षांसाठी पानपोई व मूठभर धान्य चिऊसाठी ही संकल्पनासुद्धा मुलांच्याच डोक्यातून आलेली. अनुभवांची लयलूट करणारा आपला परिसर हाच मुलांचा गुरु असतो या गुरूच्या सानिध्यात अनुभवांची लयलूट करताना वेगवेगळ्या प्रसंगातून मुलांचे वेगळेपण कळतं. मुलांच्या मनातील कल्पनांची कारंजी इथे उडत असताना दिसतात. निसर्ग शिक्षण फक्त मुलांच्या आनंदासाठी नाही तर मोठ्यांच्या समाधानासाठी ही असतं. आनंदासाठी असतं. हे हळूहळू सर्वार्थानं समजू लागलं होतं.

शाळेतील मोठ्या वर्गातील मुलं बऱ्याचअंशी वेगवेगळ्या व्यसनाच्या आहारी गेलेली. त्यांना त्या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी मुलांचे खिसे तपासणे, व्यसन करणाऱ्या मुलांना भावनिक पत्रांचे लेखन करणे व प्रत्यक्ष त्याला जाऊन विनंती करणे त्याला भावनिक साद घालणे या कृती मुलांच्या कल्पनातून साकार होऊ लागल्या. त्यातून व्यसनाच्या आहारी गेलेली मुलं सहज बाहेरही पडू लागली. शाळेमध्ये आल्यानंतर दिवसभरात कुणाची पेन हरवायची तर कुणाचे पैसे हरवायचे. यावर उपाय शोधला तो मुलांनीच दिवसभरात हरवलेली वस्तू ज्याला सापडेल त्याने मुख्याध्यापकांकडे आणून द्यायची व दुसऱ्या दिवशी ती ज्याची आहे त्याला परत करायची 'सत्कृत्य' नावाचा हा उपक्रम सुरू करता आला.एकदा शाळेतून घरी जात असताना गुलशन आणि करण या विद्यार्थ्यांना एक पिशवी सापडली ज्यामध्ये ७ हजार रुपयाची रक्कम होती. ती मिळालेली रक्कम या दोन चिमुकल्यांनी शाळेमध्ये गुरुजींना परत केली दुसऱ्या दिवशी त्या रस्त्याने जाणाऱ्या ज्या व्यक्तीची ती रक्कम होती त्याला परत करण्यात आली.

शाळेपासून चार ते पाच किलोमीटर अंतरावर एक नाला होता. त्या नाल्याच्या पलीकडे तळ्याच्या काठावर ढिवर समाजातील काही मुलांची वस्ती होती. पावसाळा सुरू झाला की त्या नाल्यावरून शाळेला येणं कठीण व्हायचं. त्यामुळे शिल्पा ,निलेश, कुंदा ,जितू ओम, बिंदू, आदी मुलांना शाळेपासून वंचित राहावं लागायचं. त्यामुळे मुलांनी त्यांच्यासाठी चक्क लाकडी पूल तयार करण्याची कल्पना सुचवली आणि या चिमुकल्या मुलांसाठी लाकडी पूल तयार केला. ही मदत या मुलांना फार भावली व त्यांनी तलावातून सर्व मुलांना छोट्या होडीतून मनसोक्त पाण्यातून सैर घडवली. सोबत मासे कसे पकडतात याचे प्रात्यक्षिकही शिल्पा ,बिंदू ,निलेश या लेकरांनी सर्वांना करून दाखवलं.केवळ शाळेतील पुस्तकांसोबत नातं न जोडता प्रत्यक्ष जीवनात शिक्षण देण्याचे काम सातत्याने होऊ लागलं होतं. दरवर्षी कुठल्या ना कुठल्या ठिकाणी सहलीला जायचं नियोजित असायचं. शाळेतील अगदी अभ्यासात व सर्व उपक्रमात पुढाकार असलेल्या वर्षा ,शिल्पा ,बिंदू पूनम या विद्यार्थिनींना घरच्या परिस्थितीमुळे यायला जमायचं नाही .मात्र मुलांना याचं फार दुःख व्हायचं त्यामुळे मुलांनी शक्कल लढवली आपण सर्वांनी मिळून वर्षभर पैसे जमा करायचे आणि ज्या मुलांना पैसे जमा करून शक्य व्हायचं नाही त्यांनाही सोबत घेऊन जायला मदत व्हायची. शाळेच्या सहली पासून कुणीही वंचित राहायचं नाही आणि सर्वांना आनंद मिळायचा. भाग्यश्री नावाची मुलगी अचानक आजारी पडली. घरची अतिशय गरीब परिस्थिती असल्यामुळे दवाखान्यात घेऊन जाणे व पुढील आजाराचा खर्च करणे कुटुंबाला शक्य नव्हते तेव्हा माझ्या या चिमुकल्यांनी आपल्या

जवळ असलेल्या पैशातून व गावात फिरून काही दानशूर व्यक्तीकडून जमेल ती रक्कम प्राप्त केली व भाग्यश्रीच्या कुटुंबाला देण्यात आली. तेव्हापासून शाळेतील आजारी असणाऱ्या मुलांच्या घरी भेट देणं सुरू झालं आणि शाळेत सोबत कुटुंबीयांनाही आनंद देण्याची सुरुवात झाली.

शाळेत अनेक लाजरीबुजरी मुलं होते. तर काही वेगवेगळ्या अडचणी घेऊन येणारी मुलं होती मात्र ते सर्वांसोबत किंबहुना गुरुजींनी सोबत व्यक्त व्हायची नाहीत. मुलांसाठी काय करता येईल असा विचार करून सुरू असतानाच सुचना पेटीची युक्ती सुचवली. ज्या विद्यार्थ्यांना अडचणी असतील, एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल त्यांनी कागदावर ती समस्या किंवा प्रश्न लिहायचे त्यावर नाव नाही दिले तरी चालेल त्यानुसार वेगवेगळे प्रश्न ,सूचना पेटीमध्ये पडू लागले. एका वर्गातील विद्यार्थिनीने सूचना लिहिली होती आमच्या मॅडम मला दररोज काही ना काही खायला घेऊन या असं सांगतात मला दररोज वस्तू आणता येत नाहीत अशी सूचना लिहिली. हे वाचून आम्ही सर्व आश्चर्यचकित झालो व आत्मचिंतन केलं. याच सोबत शाळेत ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याच्या ही सूचना येऊ लागल्या. त्यानुसार शाळेतील वेगवेगळ्या घटकांमध्ये बदलण्याची सोय झाली. कष्ट करणाऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा विचार डोक्यात आला आणि शेतकऱ्यांच्या व इतर कष्ट करणाऱ्या माणसाच्या मुलाखती घेणे सुरू झालं. त्याचसोबत मुलांच्या डोक्यातून कल्पना आली की ,आमच्या शाळेतील सर्वांच्या आवडते होलीराम भाऊ जे शाळेचे सेवक होते त्यांना महिन्यातून एक दिवस शाळेच्या सर्व कामातून सुट्टी द्यायची. त्यानुसार प्रत्येक महिन्यात एक दिवस होलीराम भाऊ यांना सुट्टी मिळू लागली. होलीभाऊ यांना दरवर्षी आवडीने मुलं राखी बांधतात व त्यांचा वाढदिवस सर्वजण मिळून शाळेत साजरा करतात. या सुद्धा कल्पना मुलांच्या डोक्यातील होत्या. पुढे सर्व शिक्षकांचे वाढदिवस मुले स्वतःहून साजरे करू लागले. शाळेत भात शिजवणाऱ्या ताईंचा सुद्धा वाढदिवस मुलांनी अगदी थाटामाटात साजरा केला. शाळेत चालणारी छोट्या समाजाची प्रतिकृती सहजरीत्या मुलं बाहेरही राबवु लागले. ग्रामपंचायतीमध्ये जाऊन सरपंचांची मुलाखत घेणे, ग्रामपंचायतीचे काम स्वतःहून विचारू लागले. शाळेविषयीच्या गरजा, अडचणी ग्रामसभेमध्ये उभे राहून मांडू लागले. मुलांचे काय किंवा शिक्षकांचे काय, जसे एक शाळेतल्या शिक्षकांचं जीवन असतं तसं घर आणि व्यक्तिगत जीवनही असतं तिथेही अनेक प्रश्न असतात. अनेक वाईट गोष्टी मुलं तिथं शिकतात आणि त्याचे पडसाद शाळेत उमटतात. अशा अनेक प्रसंगातूनही विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कल्पना राबवून वाट काढली. मुलांच्या डोक्यातील वेगवेगळ्या कल्पणा साकार होतानाच लक्षात येऊ लागलं की,माहितीचे रुपांतर ज्ञानात तेव्हाच होते जेव्हा आपण त्यावर आपल्या अनुभवाशी जोडण्याची प्रक्रिया करतो. मागे पडणाऱ्या आपल्या मित्रांना आपल्या सोबत पुढे घेऊन जाता आलं पाहिजे. यासाठी 'जिंकू जिंकू'हा मुलांच्या मनातील साकारलेला उपक्रम पुढे आला. स्वतः सोबत आपला मित्रही जिंकला पाहिजे ही मुलांच्या मनातील भावना पाहून मन अगदी आनंदानं चिंबचिंब व्हायचं. याशिवाय शिदोरी, अमृतकण , चला अमृतकण वाटूया, ज्ञान देऊ - घेऊ ,शहरातील बाजारास भेट दिल्यानंतर शाळेतही बाजार भरवण्याचं स्वप्नही साकार झालं. बाजारात प्रत्यक्ष मोठ्या माणसंप्रमाणे विद्यार्थी बाजार करताना पाहताना माझ्यासह पालकांचेही डोळे विस्फारले . 'मला बोलु द्या' या सदराखाली माझ्या चिमुकल्यांनी कुटुंबातील भन्नाट अशा संवादाची लयलूट सर्वांसाठी केली. कधी गुरुजींची नक्कल करणे तर कधी मुख्याध्यापकांच्या कडक स्वभावाचा मागोवा घेऊन नाटिका सादर करणे, तर स्वयंपाक करणाऱ्या खिचडीवाल्या ताईना स्वयंपाकात मदत करणे, तर सर्वांनी मिळून माळावर जाऊन रानमेवा जमा करणे, आठवड्यातून एकदा आई-वडिलांच्या पायांची मालिश करून देणे, गाई म्हशींच्या गोठ्यात जाऊन त्याचं निरीक्षण करणे, कुत्रा ,मांजर, शेळी ,गाय या प्राण्यांना चक्क शाळेत घेऊन येणे व त्याचं निरीक्षण करणे ,स्वतः बनवलेल्या वेगवेगळ्या वस्तूंचे प्रदर्शनही जानेवारी महिन्यामध्ये सातत्याने मांडणं अशा कितीतरी कल्पना माझ्या चिमुकल्यांच्या डोक्यातून निघतांना मला माझ्या बालपणात गेल्यासारखं वाटतं. अशा विविध कल्पनांनी भरलेलं प्रत्येक मुलांचे एक वेगळं विश्व अनुभवण्याची संधी मला प्राप्त झाली याचा मनोमन आनंद होत आहे.

शाळाही मुलाच्या अंगणातलं आनंदाचं झाड व्हायला हवं. शाळेत आल्यानंतर विद्यार्थी विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळा भावबंद तयार होतो.हा भावबंद हा सर्जनशीलतेचा केवढा मोठा शक्तीस्रोत आहे याचा आपल्याला विसर पडत चालला आहे की काय असं वाटतं. मुलं एकमेकांच्या कृतीतून कल्पनेतून खूप

काही शिकलेली असतात. वर्गामध्ये शिक्षक नसताना विना परवानगीने ते एकमेकाशी हितगुज गोंधळ मस्ती करायलेले असतात हे सर्व करताना ते सतत बरोबर असल्याने त्यांचे गहिरे नाते तयार होते. शिक्षण हा या नात्याचा भाग बनतो. आणि याच नात्यातून मुलांच्या मनातील वेगवेगळ्या कल्पना शिक्षणाचे फलित म्हणून बाहेर येऊ लागतात. शिक्षणाच्या या आनंददायी प्रवासात छोटा मित्रांसोबत माझा सुरू झालेला हा अनोखा प्रवास दररोज नित्य नवा आनंद देऊन जात आहे. दिवसभर वेगवेगळ्या अनुभवांची शिदोरी सोबत जमा करण्याचाही प्रयत्न करत आहे.

अनुभव हा तर पदोपदी आपण घेतच असतो पण अनुभवांकडे पाहायला शिकवावं लागतं तरच अनुभवांनी शहाणे झालो असे म्हणता येईल. माझ्या चिमुकल्या मुलांच्या आतमध्ये असलेल्या वेगवेगळ्या कल्पनांच्या खजिनाचा मी 'कुबेर' झालोय असंच मला मनोमन वाटत आहे.

*शिक्षणवार्ता...*

## मराठी शाळांसाठी आता सरकारचा ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

मराठी शाळेत शिकून जगाच्या पाठीवर प्रत्येक क्षेत्रात नाव होऊ शकते. अगदी जागतिक कीर्तीचे अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्यापासून विज्ञान, संशोधन क्रीडा, कला अशा क्षेत्रांतील अनेक दिग्गजांचे शिक्षण मराठी भाषेत झाले आहे. मराठी भाषेत शिक्षण घेऊन नाव कमावलेल्या एखाद्या व्यक्तीचे उदाहरण दिले तर मुले-पालक त्याला फॉलो करतील. त्याच्या नावाचे ब्रँडिंगही करता येईल. म्हणूनच मुलांना मराठी शाळांकडे वळवण्यासाठी पुढच्या काळात ब्रॅण्ड ॲम्बेसेडर नेमण्याची राज्य सरकारची योजना असल्याचे शालेय शिक्षणमंत्री ॲड. आशीष शेलार यांनी सांगितले.

मराठी शाळांची सध्याची परिस्थिती, बंद होणारे वर्ग, इंग्रजीचे वाढते प्रस्थ, मराठी भाषा सक्तीची करण्याची राज्य सरकारची योजना या विषयांवर शालेय शिक्षणमंत्री आशीष शेलार यांनी त्यांची मते व्यक्त केली. ते म्हणाले की, मराठी शाळा हा सरकारचा आग्रहाचा विषय आहे. मराठी शाळांचे संरक्षण झाले पाहिजे आणि नव्याने शाळा सुरू झाल्या पाहिजेत या भूमिकेवर राज्य सरकार आपला आराखडा तयार करीत आहे. मात्र त्याच वेळेस आपल्यासमोर मानसिक व व्यावहारिक अशी दोन आव्हाने आहेत. त्यावर मात करण्यासाठी राज्य सरकारच्या योजना आहेत.

मराठी भाषा सक्तीची करण्याचा मानस खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व्यक्त केला आहे. मराठी भाषेवर काम करणारी आपली समिती आहे. त्यात लेखक, विचारवंतांचा समावेश आहे. त्यांच्याशी आमचा संवाद सुरू आहे. त्यामध्ये एक मसुदा तयार झाला आहे. त्याआधी त्याची समिती होणे आवश्यक आहे. कारण समिती व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल अन्यथा कायदा केल्यावर कोणी तरी कोर्टात स्थगिती मिळवण्यासाठी जाईल. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर कायदेशीर प्रक्रिया परिपूर्णतेने करावी लागेल. त्यासाठी आम्ही समिती घोषित करणार आहोत. या समितीमध्ये खास करून सीबीएससी, आससीएससी शाळांचे प्रतिनिधीही घेण्याचा मानस आहे. कारण कोणालाच विचारात न घेता मराठी विषय सक्तीचा केला असे नक्राश्रू ढाळण्याचे कामच होणार नाही. मराठी भाषेच्या सक्तीबाबत आंदोलकांनी व विचारवंतांनी जो मसुदा दिला आहे त्या आधारावर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या आत या विषयावर ठोस निर्णय घेण्याचा मानस मुख्यमंत्र्यानी घोषित केला आहे, असे शेलार म्हणाले.

न्यूनगंड कमी करणार :-अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्यापासून शारदाश्रम, बालमोहन शाळेत शिकलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील दिग्गजांचा एक लघुपट मराठी शाळांमध्ये दाखवण्याचा राज्य सरकारचा विचार सुरू आहे. त्यातून त्या व्यक्तीचे प्रेरणादायी जीवन पुढे जाईल. मराठी शाळेच्या शिक्षणातून सुरुवात झाली हा संदेश समाजापुढे जाईल. अशा लघुपटातून यश संपादन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. त्यातून पालक व विद्यार्थ्यांमधील मराठी शाळांबाबतचा न्यूनगंड दूर होईल अशी अपेक्षा आशीष शेलार यांनी व्यक्त केली.



# कृष्णाकाठची संस्कृतिका...

**माधुरी अभय कुलकर्णी**
संस्कृतशिक्षिका लाहोटी कन्या
प्रशाला कराड, सातारा
चलभाष : ९८२२६१६३६६

संस्कृत ही अतिप्राचीन भाषा आहे. ती गीर्वाणवाणी, ज्ञानभाषा आहे. अनेक प्रकारच्या वैज्ञानिक संशोधनाची मूलतत्वे ही संस्कृत ग्रन्थांमध्ये सापडतात. म्हणजेच प्राचीन भारतीय जीवनशैली ही वैज्ञानिक अधिष्ठान असणारी होती. म्हणजेच भारतीयांचा आत्मा होती. स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा कोणती असावी? असा मुद्दा जेव्हा प्रथम संसदेत चर्चिला गेला, त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्कृतमध्ये ज्ञानाचे भांडार आहे. भारतीय प्रांतांना एका सुत्रात आणेल अशी भाषा म्हणजे संस्कृत आहे हे जाणून त्यांनी संस्कृत ही आपली राष्ट्रभाषा असावी असे मत मांडले होते अनेक परकीय संशोधक सध्या या लपलेल्या ज्ञानाचे भांडार उघडण्यासाठी भारतात येऊन संस्कृत भाषा शिकत आहेत. देशभरच नव्हे तर जगभर अनेक विद्यापीठांमधून संस्कृत भाषेच्या अध्ययन-अध्यापनावर लक्ष केंद्रीत केले आहे. संगणकाला देखील ही भाषा चपखल बसणारी आहे असे काही शास्त्रज्ञांचे मत आहे. अशावेळी हे ज्ञान आम्ही आमच्या मुलांपर्यंत पोहोचवायला नको का? अर्थातच यासाठी लहानपणापासूनच या भाषेविषयी उत्सुकता वाढवली पाहिजे. त्यांच्यात या भाषेची गोडी निर्माण केली पाहिजे या उद्देशानेच सुचलेल्या संकल्पनेतून शिक्षण मंडळ कराडच्या वतीने व संस्थेचे सचिव मा. चंद्रशेखर देशपांडे व सर्व पदाधिकारी यांच्या प्रेरणेतून एक संस्कृतचा आगळा वेगळा प्रयोग आकारास येत आहे, त्याचे नाव आहे - संस्कृतिका

बालानां कृते संस्कृत-तथा-संस्कति-एवं-संशोधनकेन्द्रम्।

NCF २००५ च्या राष्ट्रीय आराखड्याने सर्वप्रथम ज्ञानरचनावादाचा उपयोग अध्ययन अध्यापनात झाला पाहिजे असे सांगितले. २२ जून २०१५ ला यावर शासन निर्णय झाला. त्यानुसार अनेक शाळांची फेररचना झाली. सर्व विषयांसाठी शासन पातळीवर खाजगी संस्थांमार्फत शिक्षकांसाठी प्रशिक्षणे घेतली गेली.अनेक शैक्षणिक प्रयोग आकाराला येऊ लागले. ज्ञानरचना वादाबरोबरच बहुविध बुद्धिमत्तेसारखे अनेक विचार शिक्षण प्रक्रियेत डोकावू लागले. मग या सर्व गोष्टींचा अभ्यास करताना असे जाणवले की या संशोधनाची तत्वे आणि प्राचीन भारतीय गुरुकुल पद्धतीची तत्वे यांचा सुरेख संगम करता येईल. कारम दोन्हीमध्ये बरेच साम्य मला जाणवले. मग संस्कृत विषयाच्या अध्ययन अध्यापनासाठी अनेक शैक्षणिक विचार घेऊन उभी राहिली ती संस्कृतिका. नेमके काय आहे या संस्कृतिकेमध्ये? आणि काय आहेत तिची उद्दीष्टे?

पहिले दालन आहे ते साधना वर्ग.

आपल्या नेहमीच्या शिक्षण पद्धतीमध्ये आपला अभ्यासक्रम पूर्ण व्हावा, मुल्यमापन वेळेत व्हावे या दृष्टीने पाठ्यक्रम घटक नियोजन अशा तांत्रिक गोष्टी निर्माण केल्या आहेत. पण मुलांना त्याचा किती त्रास होतो याचा विचार आपण करत नाही. इतिहासात तो जरा रमतो तोच विज्ञान कोसळते, विज्ञान कळते ना कळते तोच मराठी ......... म्हणजे विचारांना गति मिळेपर्यंत तासिका संपते. शिवाय मुलाच्या मनाला स्थैर्य मिळण्याच्या दृष्टीने कोठेच विचार नाही. मग यासाठी आम्ही साधना वर्ग निर्माण केला आहे. मुलांनी याठिकाणी मौन, ओमकार जप, ध्यानधारणा करावी. स्तोत्रदालनात अनेक स्तोत्रे आहेत त्या स्तोत्रांच्या योग्य

उच्चारणाने मनशुद्धि, मनःशांती मुलांनी मिळवावी. मुलांच्या मनात सकारात्मक उर्जा निर्माण व्हावी अशासाठी हा प्रयत्न आहे.

यानंतरचा विभाग आहे तो ज्ञानरचनावादी संस्कृत खेळ शाळेचा. मुल जेव्हा स्थिर होईल तेव्हा ते अध्ययनाकडे वळेल. हे मुलसूत्र धरुन या वर्गाची रचना केली आहे. आठवी ते दहावीचा संस्कृत विषयाचा पाठ्यक्रम विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन पद्धतीने शिकता येईल अशी सोय याठिकाणी केलेली आहे. ज्ञानरचनावादी अशी ही संस्कृतची प्रयोगशाळा आहे. विद्यार्थ्याला एकच घटक पुनःपुनः शिकता येण्याची सोय आहे. त्याला इयत्तावार पाठ्यक्रम पूर्ण करता येईल. त्या त्या वेळी त्याला तिनही वर्षातील जो घटक शिकण्याची इच्छा आहे तो घटक तो शिकू शकेल. त्यासाठी लागणारे पूरक/ मदत साहित्य -धातूकोष, अर्थकोष येथे उपलब्ध आहे. अनेक संदर्भ ग्रंथ, गोष्टींची पुस्तके, वाचनमाला उपलब्ध आहेत. अनेक प्रकारचे तळवर्शी याठिकाणी आहेत. बालभारतीचे QR Code मधील सर्व material उपलब्ध आहे. मार्गदर्शक म्हणून शिक्षक आहेत.

कोणत्याही भाषेचा शब्दसंग्रह प्रथम समृद्ध झाला पाहिजे. यासाठी प्रयत्न केले आहेत. जसं मूल पडत पडतच उभे रहायला शिकते त्याप्रमाणे याठिकाणी 'चूकत चूकत शिकणे' हे मूलतत्व गृहीत धरले आहे. यामध्ये उल्लेखनीय मुद्दा असा आहे की व्याकरणावर भर न देता मुलांना भाषा शिकता आली पाहिजे यावर भर दिला हे. म्हणजे भाषेचे नियम न सांगता शब्दसंग्रह आणि वाक्यांचा सराव देणे हा उद्देश आहे. आजपर्यन्त कदाचित व्याकरणाचा बागुलबुवा दाखविल्यामुळेच अनेकांनी संस्कृतकडे पाठ फिरवली. कोणतीही भाषा शिकत असताना प्रथम चूका या होणारच हे गृहीत आहे. उदा. लहान मुल बोलताना - आई आला बाबा गेली, काल ला आज, आणि आज ला काल. शिवाय ' काल आम्ही बागेत जाणार...' अशी वाक्ये बोलतेच. म्हणून आपण त्याचे बोलणेच थांबवत नाही. आपण म्हणतो हळूहळू येईल त्याला. संस्कृत भाषा ही जर रोज कानावरच पडत नाही तर मुल लगेच संस्कृत वाक्ये आणि ती सुद्धा बरोबरच करेल अशी अपेक्षा चूकीची आहे. यासाठी त्याचा शब्दसंग्रह वाढविणे हे आमचे पहिले उद्दिष्ट आहे. याठिकाणी मुलांसाठी ग्रंथालय उपलब्ध आहे. धातुकोश, शब्दकोश, संस्कृतिकोश मुलांनी हाताळावेत अशी अपेक्षा आहे. अनेक ग्रन्थ आहेत, उच्चारण शास्त्रासाठी वेगवेगळे मॉडेल्स, संगणकाचा वापर करुन अनेक Presentations तयार केलेली आहेत. श्रवण कौशल्यासाठी वार्तावली, संस्कृत वार्ता,वुेपश्रेरव करुन ठेवलेल्या आहेत. संस्कृत संदेशः, संस्कृत भवितव्यम सारखी मासिके उपलब्ध आहेत.

एकाच निरस वर्गखोलीमध्ये शान्त बसून अध्ययन करणे हा मुलांचा मुळस्वभाव नसतो. म्हणून त्यांच्यासाठी गुरुकुलपद्धतीप्रमाणे अंगणात झाडाखाली बसून शिकण्याची सोय याठिकाणी केली आहे. याठिकाणी कडेला असणाऱ्या भिंतीवर अनेक संस्कृत मधील साहित्य चित्रमय रुपात उलगडून दाखविले आहे. योग्य वयातच मुलांना जर आपण आपले ज्ञानाचे भांडार उघडून दाखविले तर ते परिणामकारक होईल. या भारतामध्ये अनेक शास्त्रे विकसीत होती- रसायनशास्त्र, विज्ञानशास्त्र, आयुर्वेद, योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र. मग यांची माहिती करुन देणारी याठिकाणी छोटीशी संस्कृति सहल याठिकाणी निर्माण केली आहे. त्याचबरोबर आयुर्वेदातील उल्लेख केलेल्या काही औषधी वनस्पतींची बाग याठिकाणी केली आहे. म्हणजेच जीवन जगण्याची पद्धत आमच्या संस्कृत ग्रंथामध्ये सकारण-लयबद्ध श्लोकांमध्ये रचून ठेवली आहे. संस्कृत ही नुसती भाषा नाही तर ती आदर्श जीवन जगण्याची पद्धत आहे. हजारो वर्षे भारतीय याच ज्ञानावर सुखी, निरामय, दीर्घायुष्य जगत होते. याची जाणीव मुलांना करुन देणे व प्राणायाम, योगासने, योग्य आहार यांचे महत्व पटवून देणे हा उद्देश या सहलीचा आहे.

आतील बाजूस एक मोठा वर्ग आहे ज्याठिकाणी कोणतीही बैठक व्यवस्था नाही. शब्द संग्रह वाढविण्यासाठी अनेक खेळ उपलब्ध करुन दिले आहेत. संस्कृत भाषेमध्ये मुले पत्ते खेळतील, सापशिडी खेळतील, बाहुलीनाट्य करतील, छोटी छोटी वाक्ये मुलांनी बनवावीत म्हणून selfie point सारख्या नविन संकल्पना याठिकाणी आहेत. संस्कृत शब्दांचे खेळ आहेत. make 'n' know आहेत. संगणकाचा वापर अत्यंत कल्पकतेने केलेला आहे. संगणकावर श्रवण कौशल्य विकसीत होण्यासाठी संस्कृत कथा-गीते-आहेत. स्वयंअध्ययन पद्धतीने संस्कृत शिकता यावे म्हणून राष्ट्रीय संस्कृत संस्थानचे १ ते १२० episode download केले आहेत. त्याचप्रमाणे सध्या संस्कृत विषयासाठी अनेक नवनविन प्रयोग केले जातात, videos बनविले जातात हे देखील याठिकाणी वुेपश्रेरव केलेले

आहे शिवाय संस्कृत विषयासाठी उपयुक्त असणाऱ्या अनेक internate links याठिकाणी ठेवलेल्या आहेत. लेखन कौशलम् मधील चित्रवर्णनम् घटकासाठी अनेक चित्रे याठिकाणी आहेत. LCD Projector चा वापर करुन एकाचवेळी अनेक मुले याचा लाभ घेऊ शकतील.

संस्कृत वर्णोच्चारांसाठी काही models याठिकाणी बनविली आहेत. मुलांना सुभाषिते, अमरकोष, भगवद्गीता त्यांच्या इच्छेने ऐकता येतील. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकातील शब्द व लकार हे कोठे Recorded नाहीत. मग त्याचे योग्य उच्चारणात ध्वनीमुद्रण करुन याठिकाणी ठेवले आहे. आठवी ते दहावी एस.एस.सी. बोर्डाचा सर्व अभ्यासक्रम स्वयंअध्ययन पद्धतीने मुलाला शिकता आला पाहिजे यादृष्टीने अनेक पाठ्यमुद्यांची मांडणी तक्ते, खेळ यास्वरुपात केली आहे.

ग्रंथालयामध्ये अमरचित्रकथा मधील शाकुन्तल, रामायण, महाभारत स्वप्नवासवदत्ता इ.अनेक प्रकारचे साहित्य आहे. नित्य वापरातील पाककृती, संस्कृतमधून शुभेच्छा, संस्कृत समयरेषा, नामे व विशेषणांचे अनेक खेळ आहेत. 'घोका व ओका' हे मूलतत्व न धरता चूका व शिका हे मूलतत्व गृहित धरले आहे. संस्कृत विषय शिकण्यासाठी माध्यमिक गटासाठी जे जे आवश्यक आहे ते ते सर्व एकाच छत्राखाली देण्याचा प्रयत्न याठिकाणी केलेला आहे. त्याचप्रमाणे भारतात व भारताबाहेर संस्कृत अध्यापनाची विद्यापीठे कोठे कोठे आहेत, मुलांना पुढे जाऊन संस्कृत विषयांत कोणते भवितव्य घडवता येईल याची माहिती दिली आहे. भविष्यात या संस्कृतिके मार्फत संस्कृत विषयातील संशोधनासाठी अनेक उपक्रम कार्यान्वित केले जाणार आहेत. या संस्कृतिकेचा वापर सर्व विद्यार्थी, अध्यापक व संस्कृत प्रेमींनी करावा अशी इच्छा आहे. समर्पयामि संस्कृताय जीवनम अशी पिढी पुन्हा एकदा उभी रहावी ही इच्छा आहे. थोडक्यात वर्धिष्णू असा हा प्रथम प्रयोग आम्ही साकारलेला आहे 'संस्कृतिका'.

*शिक्षणवार्ता...*

## शाळांवर रूफ टॉप सोलर प्रकल्प

राज्यांमधील शाळांच्या छतांवर रूफ टॉप सोलर प्रकल्प साकारण्यात येणार आहे. यासाठी राज्य शिक्षण संस्था महामंडळच सरकारला प्रस्ताव देणार आहे. यामुळे वीजबिलाची बचत होणार असून, प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची जमीनसुद्धा घेण्याची गरज भासणार नाही.

राज्यात एक लाख १० हजार प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहेत. शाळेकडे मोठे आवार आणि इमारती उपलब्ध आहेत. छतांचा काहीच उपयोग नाही. सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यासाठी जमिनी अधिग्रहित करावी लागते, तसेच मोबदल्यावर बराच खर्च करावा लागतो. खासगी कंपन्यांना मालमत्ता करात सवलत द्यावी लागते. यामुळे मोठ्या महसुलासही सरकारला मुकावे लागते. खर्चिक बाब असल्याने सोलर निर्मितीला हवी तशी गती मिळालेली नाही. त्यामुळे शिक्षण संस्थांनीच यासाठी पुढाकार घेण्याचे ठरविले आहे.

राज्यातील बहुतांश शाळांच्या स्वत:च्या इमारती आहेत. शाळेत विजेच्या बिलासाठी कुठलीही सवलत दिली जात नाही. त्यामुळे शाळांना विजेच्या बिलापोटी मोठी रक्कम खर्च करावी लागते. ते विजेचे बिल सरकार वेतनेतर अनुदानाच्या माध्यमातून शाळांना मिळते. मात्र, महापालिका, नगरपालिका परिसरात असलेल्या शाळांना मालमत्ता करापासून कुठलीच सूट मिळत नाही. त्यामुळे शाळांच्या छतावर सोलर प्रकल्प झाल्यास सरकारचा वेतनेतर अनुदानाच्या माध्यमातून देण्यात येणारा कोट्यवधींचा पैसा वाचेल. दुसरीकडे शाळांमध्ये रूफ टॉप सोलर प्रकल्प लावल्यास वीजबिलात कपात होईल.



# स्ट्रॉबेरीच्या गावी फुलला साहित्यमळा

**सारिका निशांत रंधे**
सावित्रीताई व्यं. रंधे कन्या विद्यालय
शिरपूर जि. धूळे
चलभाष : ९८५०२४७१२२

सह्यकड्यांच्या विस्तीर्ण पसरलेल्या रांगा आणि महाबळेश्वर म्हणजे सृष्टीला पडलेले सूंदर स्वप्न होय ! अशा रम्य हिरवाईचा साज असलेल्या ठिकाणी वाचनानंद घ्यायला कोणाला आवडणार नाही? पाचगणीसारख्या हायप्रोफाईल शैक्षणिक हब असलेल्या हिलस्टेशपासूनच ५ कि.मी. अंतरावर आहे भिलार गाव . महाराष्ट्रातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून ओळखले जाते.पुस्तकांचे गाव म्हणून वाचनसंस्कृतीत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. येथे भेटीसाठी येणाऱ्या रसिकांचे मनोभावे स्वागत अतीथी देवो भव: म्हणुन करत असतात.शब्दांची श्रीमंती या गावाला लाभली आहे.अबालवृद्ध या साहित्यझऱ्यात चिंब होण्याचा आनंद घेतात. पूरोगामी महाराष्ट्राला घडवण्यात ग्रंथांचा मोलाचा वाटा आहे. भिलार हे ग्रंथग्राम म्हणून नावारूपास आल्याने महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या शिरपेचात मानाचा तूरा खोवला गेला असे सांगावेसे वाटते.

मराठी अस्मिता जपण्यासाठी पुस्तकांचे ग्राम मैलाचा दगड ठरला आहे.एकिकडे सोशलमिडीयावर हरवलेले लोक आणि दुसरीकडे चितंनशिल हे गाव वाचन प्रेरणा ,नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले.पाहून हरखून गेले.किमान तीन दिवस तरी लागतात संपूर्ण भ्रमणासाठी.पब्लिसीटी पासून दूर राहणारे कार्यकर्ते मग ते सेलिब्रिटी आले तरीही! विविध शहरांतून येणाऱ्या वाचनप्रेमींची वर्दळ पाहायला मिळाली.

पुस्तकाच्या या गावाची वैशिष्टय मला नमूद करावीशी वाटतात. १) गावकऱ्यांनी स्वत:च्या घरातील एक खोली या उपक्रमासाठी दिली आहे. २) प्रत्येक भिंतीवर ,रस्त्याच्या कडेने अभंग,साहित्यिकांचे चित्र,सुविचार सुबकतेने चितारलेले दिसतात.३) महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध चित्रकारांनी ऊत्सफुर्तपणे यांत सहभाग दिला आहे.४)२५,०००हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे.५)निसर्गाच्या सानिध्यात वाचनानंद काही औरच आहे.६) मुख्य कार्यालयात शाब्दिक खेळ ,वर्षपूती मासिक व इतर वस्तू माफक दरात ऊपलब्ध आहेत.७)महाराष्ट्र शासन साहित्य विभागाने ४ मे २०१८ ला मा.सुभाष देसाई मंत्री उद्योग म.राज्य यांच्या शूभहस्ते पार संपन्न झाला.८)हे वॉन वे या इंग्लडमधील पुस्तकांच्या गावांच्या मूळ संल्पनेतून साकारलेली आहे.९)बालसाहित्य,कादंबरी,चरित्र व आत्मचरित्र ,नाटक व चित्रपट ,परिवर्तन चळवळ,दिवाळी अंक, क्रिडा व विविध लोकप्रिय साहित्यप्रकार ई ३०दालनं खूली केली आहेत.


अशा या टुमदार गावातील हा अभिनव साहित्य ऊपक्रमात महाराष्ट्राचे मा.शिक्षणमंत्री विनोद तावडेजी व मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांनी जातीने लक्ष घालून २७ एप्रिल२०१८ ला लोकार्पण केले.या सोहळ्यास सारस्वतांची मांदीआळीच भरली आणि अवघी दुमदुमली पंढरी असा फिल येतो.दिग्गज डॉ सदानंद मोरे,डॉ अरुणा ढेरे,संदीप खरे,सलील कुलकर्णी , प्रदीप निफाडकर यांनी आवर्जून उपस्थिती दिली.दिव्यत्वाची प्रचिती देणारा हा सोहळा अनेक शब्दश्रमींनी 'याची देही याची डोळा' अनुभवला. माय मराठी वाचन संस्कृती वृद्धींगत करण्याच्या या कार्यातून 'आम्हां घर धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्रे' प्रत्यय आल्याशिवाय रहात नाही. पर्यटनाची रेलचेल असणाऱ्या या पुस्तकांच्या गावाला भेट द्यायलाच हवी! दासू वैद्य यांची ग्रंथग्राम कवितेतून ....

ग्रंथगावा जाऊ ग्रंथाचेच होऊ
शब्दासंगे धावू ओळीतून

# Rainwater harvesting



**मुरलीधर महादू नानकर**
उपशिक्षक जि.प.शाळा वडजाई
चलभाष : ९४२०४३९३६६



जलपुनर्भरण

पावसाच्या पाण्याची साठवण (Rainwater harvesting) म्हणजे पुनर्वापरासाठी पावसाचे पाणी जमा करणे. पावसाचे पाणी घराच्या छतावरून एका मोठ्या जमिनीखालच्या टाकीमध्ये गोळा करतात व वर्षभर पिण्यासाठी वापरतात. काही ठिकाणी साठवावयाचे पाणी खोल खड्डा (विहीर, शाफ्ट किंवा बोअरहोल), पाझर असलेल्या जलाशयांत साठवतात. पाणी जाळी किंवा इतर साधनांसह दंव किंवा धुक्यातूनही गोळा केले जाते. हे माणसासाठी अपेय असलेले पाणी गार्डन, पशुधन, सिंचन वा घरगुती वापरासाठी योग्य असते. कापणीचे पाणी, पिण्याचे पाणी हे दीर्घ मुदतीची साठवण करून वापरले जाऊ शकते.

**फायदे**

**जलपुनर्भरण**

योग्य प्रकारे जलसंधारण आणि नियोजन केल्यास, पाणीपुरवठ्यासाठी बाहेरील स्रोतांवर कमी प्रमाणात अवलंबून राहावे लागते.

जलसंधारणामुळे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढते.

जमिनीखालील पाण्याची पातळी वाढल्यामुळे, पाणी वर खेचण्यासाठी लागणाऱ्या विजेच्या वापरात बचत होते

जमिनीखालील पाण्याच्या प्रदूषणाचे सौम्यीकरण झाल्यामुळे, पाण्याचा दर्जादेखील सुधारतो.

जमिनीची धूप रोखण्यास काही प्रमाणात मदत होते.

गच्चीवरील पाण्याच्या संधारणाच्या पद्धती तुलनेने अवलंबण्यास सोप्या आहेत.

जलसंधारणाच्या बऱ्याच पद्धती या घरबांधण्यासाठी, वापरण्यासाठी आणि निगा राखण्यासाठी अतिशय सोप्या आहेत.

समुद्री प्रदेशाजवळील भागांमध्ये, जमिनीखालील खाऱ्या व क्षारयुक्त पाण्याची तीव्रता कमी करण्यासाठी जलसंधारण महत्त्वाचे काम करते.

निसर्गात स्वच्छ आणि गोड्या पाण्याची कमतरता असल्यामुळे अधिक गोड्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या पावसाच्या पाण्याचे नियोजन आवश्यक आहे

रेन हार्वेस्टिंग च्या पद्धती १. फेरोसिमेंट वापरून बांधलेली जमिनीखालची टाकी : ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नाही, अशा जागी छतावर पडणारे पावसाचे पाणी बंद टाकीमध्ये साठवले तर ते पिण्यासाठी उपयोगात येऊ शकते. पाऊस सुरू झाल्यावर पहिल्या दोन पावसाचे पाणी हे सोडून द्यावे. छत स्वच्छ झाल्यानंतरचे पावसाचे पाणी हे पन्हाळीद्वारे टाकीमध्ये गाळून साठवावेया प्रकारात प्रथम चौथरा बांधून घ्यावा. सांगाड्याच्या मदतीने व चिकनमेश, वेल्डमेश, सिमेंट आणि रेती यांच्या साहाय्याने टाकीचे बांधकाम करावे. याला

फेरोसिमेंटची टाकी म्हणतात. पाणी पिण्यास वापरतेवेळी शिफारशीत प्रमाणात लिक्विड क्लोहरिन किंवा गोळ्यांचा योग्य तो वापर करावा. यासाठी अंदाजे अडीच ते तीन हजार रुपये एवढा खर्च येवू शकतो.

२. झिरप खड्डा: पावसाळ्यात घराच्या छतावर साठणारे पावसाचे पाणी छताच्या उताराच्या बाजूने पाईप लावून खाली घ्यायचे. पाईपद्वारेच हे पाणी विहिरीजवळच्या शोषखड्ड्यात किंवा ते वाहून न जाता जमिनीत मुरेल अशा प्रकारे झिरप खड्ड्यात सोडायचे. आपण राहत असलेल्या जागेमध्ये पाच फूट लांब, पाच फूट रुंद आणि साधारण चार-साडेचार फूट खोल खड्डा घ्यावा. हा खड्डा दीड फूट उंचीपर्यंत दगडी-गोट्यांनी भरावा. त्यावर दीड फूट उंच विटांच्या तुकड्यांचा थर द्यावा. विटांच्या तुकड्यांवर दीड फूट वाळू टाकून खड्डा भरून घ्यावा. छतावर पडणारे पाणी या खड्ड्यात सोडून द्यावे. या तीन थरांमधून पाणी जाताना ते गाळले जाईल आणि स्वच्छ पाणी जमिनीच्या पोटात साठायला लागेल. पाणी साठविण्याची ही साधी, सरळ आणि सोपी पद्धत आहे. शिवाय या पद्धतीला खर्चही कमी येतो. हीच पद्धत वापरून प्लॉटमध्ये पडणारे पाणीही आपण साठवू शकतो. प्लॉटवर उतार असेल, तर झिरप खड्ड्याऐवजी झिरप चर तयार करायचा आणि त्यामार्फत जमिनीत पाणी मुरवायचे. हे करण्यासाठी थोडाफार खर्च होईल पण एका कुटुंबाला वर्षभर पुरेल एवढ्या पाण्याची सोय नक्कीच होते.

३. कूपनलिका/बोअरवेल पुनर्भरण:

पावसाचे पाणी कुपनलीकेत सोडणे म्हणजेच कुपनलिका पुनर्भरण होय. कुपनलीकेजवळ नाला अथवा ओढ्याचे पाणी वळवावे. कुपनलीकेच्या स्वभोवताली २X२X२ मीटर आकाराचा खड्डा खोदावा. कूपनलिकेच्या सभोवताली दोन मीटर रुंद व दोन मीटर खोल आकाराचा खड्डा खोदावा. खड्ड्यातील उंचीएवढ्या केसिंग पाइपच्या भागात एक-दोन सें. मी. अंतरावर सर्व बाजूंनी विशिष्ट व्यासाची छिद्रे पाडावीत. या छिद्रांवर नारळदोरी (काथ्या) घट्ट गुंडाळावी. खड्ड्याचे चार भागांत विभाजन करून सर्वांत खालच्या भागात दगडगोटे, त्यावरील भागात खडी, त्यानंतरच्या भागात वाळूची चाळ व सर्वांत वरच्या भागात बारीक वाळू भरावी. आपल्या प्लॉटमध्ये किंवा सोसायटीमध्ये असलेल्या बोअरवेल किंवा विहिरीत पडणारे पावसाचे पाणी गाळून घेऊन त्यात सोडल्यास उन्हाळ्यातसुद्धा पाणी उपलब्ध होऊ शकेल. तुमच्या भागात एखादी मृत झालेली किंवा कोरडी कूपनलिका किंवा विहीर असेल तर त्यात हे पाणी सोडले, तर दोन-तीन वर्षांत ती पुन्हा जिवंत' करणे या पद्धतीने शक्य होते. जलसंधारणाचा हा प्रकार प्रत्येकाने शक्य होईल त्या प्रकारे अंमलात आणणे अतिशय आवश्यक आहे. जागेची कमतरता असल्यास त्याप्रमाणे शक्य तेवढा मोठा खड्डा घ्यावा आणि त्यात पाणी मुरवायला सुरवात करावी. सगळे नाही, निदान थोडे तरी पाणी आपल्या ताब्यात राहील. यासाठी अंदाजे तीस हजार ते चाळीस हजार रुपये एवढा खर्च येवू शकतो.

रेन वॉटर हार्वेस्टिंग करताना घ्यावयाची काळजी:

१. छपराच्या उताराचा आणि कुटुंबाच्या गरजेचा नीट अभ्यास करून टाकीचे आकारमान ठरवावे.

२. पाऊस पडण्यापूर्वी छप्पर स्वच्छ करवे. किंवा सुरुवातीला एखादा तास पाऊस पडून गेल्यानंतर पाणी टाकीत सोडावे.

३. टाकीत पाणी सोडण्यापूर्वी लहानशा फिल्टर टँकमध्ये अनुक्रमे विटांचे लहान तुकडे, कोळसा व वाळू यामधून जाईल अशी सोय केल्यास पाणी अधिक शुद्ध होते.

४. टाकी सिमेंट किंवा आरसीसीमध्ये बांधावी. टाकी जमिनीखाली बांधल्यास जागेची बचत होते आणि पाणी सुरक्षित राहते. तसेच टाकी सर्व बाजूंनी बंदिस्त असावी.

या रेन वॉटर हार्वेस्टिंग किंवा जलपुनर्भरणासाठी केला जाणारा खर्च, हा खर्च नसून ती भविष्यकाळाची गुंतवणूकच आहे. ज्यांच्याकडे नळाला चोवीस तास पाणी येते, ज्यांनी पाण्याचा दुष्काळ कधी अनुभवलेलाच नसतो, त्यांना कदाचित या जलपुनर्भरणाचे फारसे महत्त्व वाटणार नाही. पण आज पर्यावरणाची परिस्थिती पाहता, भूगर्भातील पाणी संपायलाही फारसा वेळ लागणार नाही. तेव्हा पावसाचे पाणी हे निसर्गाने दिलेले दान समजून त्याचा जास्तीत जास्त वापर करणे गरजेचे आहे.

मराठी मासिक
शिक्षणयात्री

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No. MAHMAR2015/67226



एम.के.भामरे
सामाजिक कार्यकर्ते शिरपूर,धुळे
चलभाष : ९८५०५१५४२२

# श्रावणातलं वनभोजन !



श्रावणात सर्व बंद असतो हो...'' आमचा खाणारा-पिणारा मित्र चैत्रातून माझ्या आग्रहाच्या निमंत्रणाला नाकार देत होता.

घराघरातील आजी-आजोबा, आई-वडील, मुलगा-सून व नातवंडे यांना एकत्र करून जवळपास कुठेतरी वनभोजनाला जावे म्हणून कार्यक्रम आयोजित केला होता. यामुळे घरातील तिन्ही पिढ्या एकत्र स्नेहभोजनाचा आनंद लुटतील व घराचं घरपण फुलून येईल, हा त्यामागचा हेतू. परंतु प्रथम ग्रासे मक्षिका पात, या म्हणीप्रमाणे आमच्या या रसिक मित्राने मला हिरमुसले केले होते, तरीही जिद्दीने मागे लागून त्याच्यासकट ४०/५० लहान-मोठ्या स्त्री-पुरूषांना एकत्र करून आम्ही वनभोजनाला निघालो. ७१ वर्षांच्या आजोबापासून चार वर्षांच्या नातूपर्यंत. वेगवेगळ्या प्रकारची वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी त्यात सहभागी होती.

निसर्गाने नटलेल्या वनराईमध्ये आम्ही पोहोचले! एका विशाल वृक्षाच्या खाली सतरंजी टाकून बसलो. सभोवार नजर फिरवली. सिमेंट, विटा, दगड, माती, वाळु, लोखंड यांनी बनलेल्या सुंदर सुंदर इमारतींमध्ये वास्तव्याला असलेली आपण मंडळी त्याच्यातच रमतो. त्याच्याकडेच कौतुकाने पाहतो. कुणाची इमारत किती लाखांची, कुणाचा बंगला किती अलिशान, कुणाचं इंटेरियरर किती सुबक अशा गप्पा मारतो. कौतुक करतो परंतु निसर्गाने दिलेल्या विनामूल्य सौंदर्यांच्या साठ्याकडे आपलं लक्षच जात नाही. प ण जरासं का कुतुहलाने नजर टाकली तर तो नटलेला, सजलेला रंगीबेरंगी निसर्ग आपल्याला वेड लावल्याशिवाय राहत नाही. त्याला हवी फक्त दृष्टी . त्या दृष्टीनेच सभोवतालचा तो निसर्ग आम्ही न्याहाळू लागलो आणि त्याच्या रंगात रंगूही लागलो. आपल्या कुशल हाताने किती आकर्षक असे डोंगरदऱ्यांची रचना केलेली...आपल्या मुलायम कुचल्यांनी रंगवलेली आणि त्यात नदी,नाले, झरे, तलाव यांची बरसात केलेली, ती पाहत बसलो.

दुपारचे बारा वाजले. फिरून भटकून खेळून थकलेल्या शरीराला कडकडून भूक लागली होती. प्रत्येकाने घरून आणलेले डबे सोडले. कुणाचा डबा, कुणाची पिशवी, कुणाचा टिफीन, कुणाची हॉटपॉटमध्ये बांधून आणलेली शिदोरी काढली. प्रत्येकाच्या डब्यातल्या भाज्या एकत्र केल्या. कुणाची बटाटे भाजी, मूगडाळ, शेवभाजी, कुणाची उसळ, कुणाचे वाटाणे, कुणाची चवळी सर्व एकत्र केल्याने सुंदर अशी मिक्स व्हेज तयार झाली. वेगवेगळ्या लाभार्थ्यांना एकत्र केलं. अशी बाहेर वेगवेगळ्या कंपनीची लेबल लावलेली ही लोणचे मंडळी आनंदाने हातात हात घालून एकत्र नांदत होती. पोळी, पराठा, तंदुरी, दशमी, पापडी, पुरी, भाकरी सर्व एकत्र आली. प्रत्येकाचं ताटं भरून गेलं.

कांदा, कैरी, पापड, लिंबु, काकडी ही तोंडी लावणं अलगदपणे आपलं ताटाच्या कोपऱ्यात जाऊन बसलो. त्यांच्या बाजूलाच मिरची, कूट घालून सजलेले वांगे, कारले, कोशिंबीर यांनी अतिक्रमण करून दादागिरीने जागा सांभाळलेली. ''वदनी कवळ घेता- नाम घ्या श्रीहरीचे '' अशी प्रार्थना म्हणून कावळे ओरडत असलेल्या पोटात घास टाकावा म्हणून '' आक्रमण''

असा जल्लोष करून त्या अन्नपदार्थांवर तुटून पडलो आणि काय सांगू मित्रांनो?

काय चव होती हे त्या जेवणाची. घरात एरव्ही दोन चार भाज्या खाणारं आपण त्या तेथे वेगवेगळ्या भाज्यांच्या चवीने चक्रावून गेलो. बिच्चाऱ्या जिभेची नुसती त्रेधातिरपीट उडत होती. कधी कडू कारले, तर कधी तिखट चटणी, कधी आंबट लिंबू, तर कधी झणझणीत मिरची, कधी तुरट आवळ्याचं लोवणं, तर कधी गोड सोहन पापडीचा स्वाद. जिभेची तारांबळ उडाल्याने तिने विशिष्ट चव सांगण्याऐवजी मिक्स चव एवढच मेंदूला कळवू लागली. ताटभर इकडे तिकडे हात फिरवल्यामुळे त्यांची कसरत सुरू होती. जमिनीवर बसल्यामुळे गुडघ्यांना रग लागली होती पण...

खऱ्या अर्थाने नवरसाने भरलेले ते अन्नपूर्णाचे परिपूर्ण ताट खूप आनंद देत होते. रसनाला तृप्त करत होते आणि तेवढ्यात कोपऱ्यातल्या एका जिनसाकडे आमचं लक्ष गेले, आमच्या एका शेतकरी मित्राने भात्यात (कापडी फडक्यात) बांधलेली ती भाकरी होती. ती सोडली. वाह...वाह...वाह...

सर्व मैफीलमध्ये बाजूला बसलेला त्या बुजलेल्या मित्राकडे पाहिले, त्याची शिदोरी होती ती. चुलीवर एकोटी ठेवून मक्याच्या पिठाची ती भाकरी होती. पिवळी धमक. पोपडा काढून आतमध्ये खुडा (ठेचा) टाकलेला होता. आमच्या तोंडाला पाणीच सुटले.

पिझ्झा बर्गर, चायनीज, पंजाबी डिशेशवर ताव मारणाऱ्या उच्चभ्रू लोकांनी कुतूहलाने पाहिले. त्या सर्वांच्या ताटात मी त्या भाकरीचा तुकड व चिमटीभर खुडा काढून आलो. त्यांना म्हटलं. हा माझ्या गरीब शेतकरी मित्राचा मेवा हा प्रसाद आहे. चुलीवर शेकोटीवर एकोटीवर भाजलेला प्रसाद आहे. सर्वांनी आनंदाने तो खाल्ला आणि त्या रंगतदार जेवणाला खरी कळसाची शोभा आली. एखाद्या सोन्या-चांदीच्या दानावर जोपर्यंत तुळशीपत्र ठेवले जात नाही तोपर्यंत त्याला महत्त्व प्राप्त होत नाही. तसंच त्या जेवणावर या खुडाभाकरीच्या घासाने रंगत आली ते जेवण सुग्राम बनले.

या अन्नपदार्थांना त्यांची चव होतीच, स्वाद होताच हो. पण त्यात मिसळला होता हो घराघरातल्या वात्सल्याचा नवरस!, प्रत्येक घरातील आईने, बहिणीने, बायकोने, मैत्रिणीने अत्यंत मायेने तो बनवलेला होता. कुणाला चुलीची, कुणाला गॅसची, कुणाला ओव्हनची, तर कुणाला तंदुरी भट्टीची उब मिळाली होती .म्हणून ते अन्न स्वादिष्ट होतं. घरी एकटं जेवताना एवढ्या हातांच्या मायेच्या स्पर्शाने बनलेला स्वयंपाक आपल्याला मिळतो का खायला?

आम्ही जेवत असताना एकटे थोडीच जेवत होतो? आमच्या वनभोजनात जंगलातल्या लता वेली होत्या, झाडावरची फुले होती, फुलांच्या पडद्याआड लपून पानं होती, कधी मेथीची जुडी, तर कधी फांडोगाचा पाला, तांदळाची भाजी, चिलची भाजी या वनभाज्याही शब्दरूपाने आमच्या ताटात होत्या. डोंगरावरची माती उघड होती. आकाशातलं पाणी वर्षावत होत म्हणून ते अन्न चटकदार होते.

त्यात मग पाऊस कसा मागे राहील? तो कधी रिमझिम बरसत होता, तर कधी दड् दड् दड् करत मला का जेवायला बोलवत नाही? असा रूसत होता.

बालकवींच्या

श्रावण मासी, हर्ष मानसी<br>
हिरवळ दाटे चोहीकडे<br>
क्षणात येती सरसर शिरवे<br>
क्षणात फिरूनी उन पडे

या कवितप्रमाणे फुलणारं ते वातावरण होते. कधी चिमण्यांची चिवचिव, कधी कावळ्यांची कावकाव, तर कधी पोपटाचं मिठू मिठूचं संगीत सोबतीला होते आणि प्रभूमि महत्त्वाचं होत हे म्हणजे जेवताना सोबत होती ती सर्व सहृदयी माणसांची, त्यांच्या प्रेमाची, आवडाची, मस्करीची, विनोदाची, आपुलकीची, त्यामुळे किती जेमतेम हे सुद्धा कळाले नाही. घरातल्या तिन्ही पिढ्या गुण्यागोविंदाने जेवत होत्या. घराला घरपण प्राप्त होते ते डायनिंग टेबलावरच, असं एकत्रित जेवणाचा आनंद अखेरच असतो आणि आज तो आम्ही उपभोगत होतो.

पोट तुडूंब भरलं, आता मन तृप्त झालं. त्यावर बडीशोप, ओवा, शोपा, मुकरी, लवंग, वेलदोडा चघळत चघळत गप्पागोष्टी, विनोद, भजन, गाणं, नाचणं, कुदणं, भेंड्या खेळणं करत करत मनात हुरहुर ठेऊन परतलो.

प्रत्येकाचा आनंदी चेहरा एकच प्रश्न विचारत होता.

पुढचं वनभोजन कधी?

आणि आमच्या तो खाता-पिता मित्र म्हणाला...

ताट...मी ही आता श्रावण पाळणार आहे बरं का. कुठल्याही फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये चापून चोपून बसायचं.

औपचारिकतेच बेगडी ओझ बाळगायचं, मॅनर्सच्या पालनामध्ये आखडून बागडायचं. हजारो रूपये खर्चून नॉनव्हेज खावायच आणि तरीही अतृप्ततेची वणवण कायम ठेवायची त्यापेक्षा तर निसर्गाच्या कुशीतल हे विनामूल्य शाकाहारी वनभोजन लाखपटीने आनंद देऊन गेलं बर कां...

त्याच ते म्हणणं ऐकून मी आज पासून त्याच्याकडे पाहतच राहिलो आणि पुन्हा बालकवीला आठवत राहिलो.

सुवर्ण चंपक फुलला बिपिनी
रम्य केवडा दरवळला
पारिजातही बघता भामा
रोष मनीचा मावळला
खिल्लारेडी चरती रानी
गोपही गाणी गात फिरे
मंजूळ पावा गात त्यचा
श्रावण महिना एक सुरे
देवदर्शना निघती ललना
हर्ष माही ना ह्रदयात
वदनी त्यांच्या वाचून घ्यावे
श्रावण महिन्याचे गीत...

*शिक्षणवार्ता...*

## शिक्षक मान्यतांची पद्धत बंद

शालेय शिक्षकभरतीसाठी आता पवित्र प्रणाली सुरू झाल्याने शिक्षणाधिकारी आणि शिक्षण उपसंचालकांकडून घ्याव्या लागणाऱ्या वैयक्तिक मान्यतांची पद्धत बंद होणार आहे. यामुळे शिक्षकभरतीसह या मान्यता मिळविताना होणाऱ्या गैरव्यवहारालाही लगाम लागणार आहे. या निवड झालेल्या शिक्षकांची नावे थेट शालार्थ प्रणालीत समाविष्ट होणार असल्याने त्यांचा पगारही विनामान्यता सुरू होणार आहे.

शिक्षकांना नियुक्ती मिळाल्यानंतर वेतन सुरू होण्यासाठी अधिकाऱ्यांकडून मान्यता घ्यावी लागते. त्यावेळी शिक्षकांची अडवणूक करून प्रचंड आर्थिक गैरव्यवहार केला जात होता. पवित्र प्रणालीमुळे तो रोखला जाणार आहे. शिक्षण विभागाने आज साडेपाच हजारांहून अधिक शिक्षकांची निवड यादी जाहीर केली आहे. यातील शिक्षकांची कागदपत्रे पडताळणी केली जाणार आहेत. त्यानंतर नियुक्ती मिळालेल्या शिक्षकांच्या मान्यता घ्याव्या लागणार नाहीत. त्यासाठी विविध कार्यालयांत फाईल फिरविण्याचे दिव्य देखील शिक्षकांना करावे लागणार नाही.

शिक्षण आयुक्त विशाल सोलंकी म्हणाले, पवित्र प्रणालीतून होणारी शिक्षकांची निवड हीच त्याची मान्यता असणार आहे. मुलाखतीशिवाय निवड झालेले शिक्षक, तसेच खाजगी अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये मुलाखतीनंतर नियुक्ती झालेले शिक्षक यांच्या सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी केली जाणार आहे. त्यातून पात्र ठरलेल्या शिक्षकांचा शालार्थ आयडी तयार होईल. त्यांची नावे या शालार्थ प्रणालीत समाविष्ट केली जातील आणि त्यांचे वेतन सुरू होईल. या शिक्षकांना शिक्षणाधिकाऱ्यांकडून वेगळी वैयक्तिक मान्यता घ्यावी लागणार नाही.

गैरप्रकारांना आळा बसणार

शालेय शिक्षणमंत्री आशिष शेलार यांनी देखील पवित्र प्रणालीमुळे मान्यता मिळविण्याची प्रथा बंद होणार असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले शिक्षक मान्यता घेण्यासाठी अनेकदा शिक्षकांना अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारावे लागतात. तसेच या वेळी गैरप्रकार होत असल्याच्याही तक्रारी येतात. शिक्षकांची होणारी अडवणूक आणि त्यातून होणारे गैरप्रकार आता पूर्णत: बंद होतील. यातून शिक्षकांना मोठा दिलासा मिळेल.

# श्रावण

फिका ज्याच्यापुढं स्वर्गही दिसतो
असा श्रावण गावाकडं असतो ।।धृ.।।
डोंगर माथ्यावर, झऱ्यांचे वाहती लोट
डोंगर अंगात, शोभतो हिरवा कोट
डोंगर धुक्याचं धोतर नेसतो ।।१।।
असा श्रावण गावकडं असतो
ओल्या रानात, गवत कोवळे डुले
दाट जाळीत, फुलली देखणी फुले
वारा भवताली सुगंधी नाचतो ।।२।।
असा श्रावण गावकडं असतो
पिक भाताचं, शेतात आलय भारी
चिंता बळीची, वर्षाची सरलीय सारी
बळी खुशीने गालामधे हसतो ।।३।।
असा श्रावण गावकडं असतो
पाऊस मोत्याचा,सारखा रिमझिम पडे
त्यात उन्हाचे सांडले सोनसळी सडे
इंद्रधनुचा हार भारी दिसतो ।।४।।
असा श्रावण गावकडं असतो
सण उत्सव, साजरे घरोघरी होई
सुर पोथीचा, मारुती मंदिरी येई
माथा भक्तीने देवापुढं झुकतो ।।५।।
असा श्रावण गावकडं असतो

उत्तम सदाकाळ
-३, सप्तशृंगी सदन,
सूर्योदय रेसिडेन्सी, रविवार पेठ
जुन्नर,पुणे. चलभाष: ७७६७९७७३७९



# RAINWATER HARVESTING

**When we had thatched roofs,
The climate so pure
The rains were in their glory,
Who needs to harvest , for sure ?**

**The Earth full of resources,
The groundwater so clear
Never a shortage of food for anybody,
May be it a human, lion or deer.**

**The moment we took nature for granted,
Arose the problems galore
We started to search high and low,
For solutions to the core.**

**The concrete jungle we see now,
And potable waters' shortcoming
There arose a need ,
For rainwater harvesting.**

**Nature provides us aplenty,
We need to take care
Or our race will suffer,
When the earth becomes bare.**

- Rakesh Rathod
Head Supervisior,
M.G.M.HighSchool,Virar West,
Mumbai-8698991869


# पावसाचे गणित

## एक टीएमसी पाणी म्हणजे काय?

१ फूट X १ फूट X १ फूट म्हणजे १ घनफूट पाणी

१ घनफूट म्हणजे २८.३१ लिटर्स पाणी

२८.३१ लिटर्स पाणी म्हणजे अंदाजे दोन बादल्या पाणी

१ दशलक्ष घनफूट (१एमसीएफटी) म्हणजे १०,००,००० घनफूट पाणी

१,००० दशलक्ष घनफूट म्हणजे १ टीएमसी पाणी (एक अब्ज घनफूट पाणी)

धरणसाठ्यातील पाणीसाठा टीएमसीमध्ये मोजला जातो. महाराष्ट्राची वरदायिनी म्हणून ओळखल्या जात असलेल्या कोयना धरणाची पाणी साठवण क्षमता १०५ टीएमसी (१०५ अब्ज घनफूट पाणी) इतकी मोठी आहे.



**भावेश सोनवणे**
प्रशासन अधिकारी
नगरपालिका शहादा-नंदुरबार
चलभाष : ९६२३१३०८४२

मृग नक्षत्रापासून पावसाळा सुरू झाला की, ठिकठिकाणांहून मुसळधार पावसाच्या, बंधारे-धरणे भरल्याच्या आणि धरणांतून पाणी सोडण्याच्या बातम्या येत असतात. कुठे किती आणि कसा पाऊस झाला, त्याच्याही बातम्या येत राहतात. अनेकदा हा पाऊस मिलीमीटर्समध्ये, सॅटीमीटरमध्ये अथवा इंचात मोजला गेल्याचे पहायला मिळते. पाऊस अशा विचित्र युनिटमध्ये कसा काय मोजतात, याचेही कुतूहल वाचकांना असते. शिवाय धरणातून सोडलेल्या पाण्याबाबतही आज एक हजार क्युसेक पाणी खडकवासला धरणातून सोडण्यात आले, असे संदर्भ दिसतात, वाचायला मिळतात. काय आहेत या संज्ञांमागील गणिते? पाऊस का मोजतात मिलीमीटरमध्ये आणि काय अर्थ आहे क्युसेकचा?पाहूया....

**क्युसेक म्हणजे काय?**

धरणातून पाणी सोडताना पाण्याचे प्रमाण क्युसेकमध्ये मोजले जाते. एक घनफुट प्रती सेकंद म्हणजेच एक क्युब पर सेकंद याचा अर्थ क्युसेक असा होतो. आता वर आपण पाहिले की, एक घनफूट पाणी म्हणजे २८.३१ लिटर्स पाणी. ज्यावेळी खडकवासला धरणातून १००० क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जातो, त्यावेळी २८.३१० लिटर्स पाणी प्रती सेकंदाला नदीपात्रात सोडले जाते. कोणत्याही धरणातून जर २४ तासात सतत ११.५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला, तर त्या धरणाची पातळी २४ तासांनंतर १ टीएमसीने कमी झालेली असते.

**क्युमेक म्हणजे काय?**

क्युसेकमध्ये पाणी घनफुटामध्ये मोजले जाते. तर क्युमेकमध्ये पाणी घनमीटर्समध्ये मोजले जाते. एक क्युमेक पाणी म्हणजे प्रतीसेकंद १००० लिटर्स पाणी. म्हणजेच १००० क्युमेक या प्रमाणात पाणी सोडले जात असेल, तर १००० १००० असे १० लाख लिटर्स पाणी प्रतीसेकंद या वेगाने नदीपात्रात येत असते.

**पूर रेषा कशा असतात?**

**पांढरी रेषा :-**

एखाद्या धरणातून ३०,००० क्युसेक वेगाने पाणी सोडले असता, त्या नदीपात्राची पाणीपातळी जेथे पोहोचेल, ती रेषा व्हाईट लाईन अथवा पांढरी रेषा म्हणून ओळखली जातो. हा सर्वसामान्य पूर मानला जातो.

**निळी रेषा -**

२०-२५ वर्षातून एखाद्या वेळेस नदीचे पात्र पांढरी रेषा ओलांडते. ज्यावेळी धरणातून ६०००० क्युसेक वेगाने पाणी सोडले असता, त्या नदीपात्राची पाणीपातळी जेथे पोहोचेल, ती रेषा ब्लू लाईन अथवा निळी रेषा म्हणून ओळखली जाते.

**लाल रेषा :-**

४०-५० वर्षात अतीवृष्टीने नदीचे पात्र निळी रेषाही ओलांडते. ज्यावेळी धरणातून १,००,००० क्युसेक वेगाने पाणी सोडले असता, त्या नदीपात्राची पाणी पातळी जेथे पोहोचेल, ती रेषा रेड लाईन अथवा लाल रेषा म्हणून ओळखली जाते.

# शाळा सोडल्याच्या दाखल्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या प्रतिस्वाक्षरीची पद्धत बंद करणेबाबत...

## महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण विभाग
## संकेतांक : २०१७०५३०१२३३०५८५२१

प्रस्तावना :- शालेय विद्यार्थ्यास एका जिल्ह्यातून अथवा राज्यातून, दुसऱ्या जिल्ह्यात अथवा राज्यातील शाळेत प्रवेश घ्यावयाचा झाल्यास तसेच CBSE/ICSE/IGCSE/IB या मंडळातील शाळांतील विद्यार्थ्यांना राज्य मंडळाशी संलग्न शाळांमध्ये प्रवेश घ्यावयाचा झाल्यास अथवा राज्य मंडळाशी संलग्नित शाळेतून अन्य मंडळाशी संलग्नित शाळेत प्रवेश घ्यावयाचा झाल्यास, सध्या प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीनुसार, शाळा सोडल्याच्या दाखल्यावर (प्रमाणपत्रावर) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची प्रतिस्वाक्षरी ंची प्रतिस्वाक्षरी आवश्यक आहे. ही पद्धत केवळ ज्या शाळांनी विद्यार्थ्यांना दाखले दिले आहेत, ती शाळा अधिकृत व मान्यताप्राप्त आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी होती. तथापि सदर पद्धत बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर २०१६ अन्वये शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र नमुना सुधारित करण्यात आला असून यामध्ये शाहा मान्यता क्रमांक तसेच युडायस क्रमांक यांचा उल्लेख असल्यामुळे शाळांच्या अनधिकृततेचा प्रश्न निकालात निघाला आहे. तसेच शाळा सोडल्याचा दाखला हा संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणित केला असल्यामुळे त्यावर पुन्हा प्रतिस्वाक्षरीची गरज नाही. हे लक्षात घेवून शाळा सोडल्याच्या दाखल्यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्या प्रतिस्वाक्षरीची उपरोक्त नमूद पद्धत बंद करण्यात येत आहे. हा शासन निर्णय सर्व माध्यम व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांना लागू राहील.


## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ३५० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-. १००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--512700301000129 Ifsc-VIJB0005127

जाने-१९ ते डिसें१९(एक वर्ष) जाने१९ ते डिसें२०-२वर्ष जाने १९ते डिसें २१-३वर्ष

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मु.पो.ता.-शिरपुर जि.-धुळे ४२५४०५ (मोबा.८२०८३०१००१)



बुद्धवासी कर्मवीर अण्णासाहेब
व्यंकटराव रणधीर

किसान विद्या प्रसारक संस्थेच्या खजिनदार, महिला संघटक, पुरोगामी विचारवंत

## श्रीमती आशाताई विजयराव रंधे

आणि संस्थेचे अध्यक्ष, श्रद्धास्थान कर्मचाऱ्यांच्या सुख दु:खाचे भागीदार सर्वांचे मार्गदर्शक

## मा.भाऊसो. डॉ. तुषारजी विश्वासराव रंधे

# औक्षवंत होवोत!









(मार्गदर्शक)



- शुभेच्छुक -







नानासो. निशांतजी रंधे

श्री.शशांक विश्वासराव रंधे
(चेअरमन)

श्री.ताराचंद तुकाराम बडगुजर
(व्हा.चेअरमन)

श्री.राजकीरण सुभाष भिलाणे
(सचिव)

श्री.माळी सिताराम हरचंद,श्री.चौधरी संदीप चंद्रकांत,श्री.खाटीक जाकिर शे.अहमद श्री.इंदासे बापू शंकर, श्री.पावरा दिपक सत्तारसिंग, श्री.पाटील सुदाम संतोषराव, श्री.बंजारा बादहशाह विरोजीलाल,श्री.पाटील युवराज लक्ष्मण , श्री.रवींद्र महादू बारी, सौ.चित्ते ज्योती रवींद्र,सौ.पाटील प्रतिभा प्रल्हाद,श्री.रोहिदास धुडकू पाटील (शिपाई)

**किसान विद्या प्रसारक संस्था सेवकांची कर्मवीर व्यंकटराव आण्णा सहकारी पतसंस्था मर्या.शिरपूर जि.धुळे**

Reg No. MAHMAR2015/67226

शिक्षण यात्री

Postal Registration No.DHL/557/2018-20

सुवर्णनगरीचे उपनगराध्यक्ष

# मा.भुपेशभाई आर.पटेल



यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



## दि शिरपूर मर्चंटस् को-ऑप. बँक लि,शिरपूर

### बँकेच्या सुविधा

**सभासद व ग्राहकांचा जिव्हाळा 'आपली बँक मर्चंट बँक'**

- प्रशिक्षित व सेवाभावी कर्मचारी वृंद
- संपूर्ण संगणकीकृत
- समाजहिताचे उपक्रम
- लॉकर्स सुविधा उपलब्ध
- भारताचे रूपे नेटवर्कशी
- सतत अ वर्ग
- ५०% सोलर पॉवर वापरणारी एकमेव बँक
- वीज बिल भरणा केंद्र
- हिरक महोत्सवाकडे वाटचाल
- सभासदांसाठी मृत्यूंजय फंड योजना
- वातानुकुलित बँक
- गुंतवणुकीत भरघोस वाढविविध
- अविरत ७१ वर्षांची अखंड सेवेची परंपरा
- तत्पर सेवा व अद्ययावत सुविधा
- त्वरीत सोने तारणावर कर्ज सुविधा

### संचालक मंडळ

**मा.श्री.प्रसन्न जयराज जैन (अध्यक्ष), मा.श्री.काशिनाथ सोमा महाजन (उपाध्यक्ष)**

मा.श्री. राजेंद्र शि.पंडीत
मा.श्री.नवनीत गि.राखेचा
मा.श्री.केवलसिंग बा.राजपूत
मा.श्री. रामचंद्र उखा ठाकरे
मा.श्रीमती स्मिता व.कोठारी
मा.श्री.तुषार वि.रंधे
मा.श्री.महेश जयराम लोहार
मा.श्री.मुकेश ता.अग्रवाल
मा.श्री.विनोद शां.चावडा
श्री.शाम गो.जैन (मॅनेजर)
मा.श्री.मनोज ओ.अग्रवाल
मा.श्री. साहेबराव भि.महाजन
मा.श्री.किरण य.दलाल
मा.सौ पूनम रा.भंडारी
श्री.संजय के.कुलकर्णी (असि.मॅनेजर)

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261